रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक ९७
www.ramprahar.com
मंगळवार, २४ ऑक्टोबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

शालेय वुशू स्पर्धेत रामशेठ ठाकूर विद्यालयाचे सुयश/२
मालमत्तेच्या लालसेतून सख्ख्या भावाने बहिणींना पाजले विष/५
नैना गृहनिर्माण योजनेच्या ऑनलाईन अर्जास मुदतवाढ/६

## राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबरपासून



**नागपूर** : राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनास ७ डिसेंबरपासून नागपुरात सुरुवात होणार आहे. या अधिवेशनाचे वेळापत्रक विधिमंडळातर्फे नुकतेच जाहीर करण्यात आले. त्यानुसार एकूण १४ दिवस या अधिवेशनाचे काम चालणार आहे. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला ७ डिसेंबरपासून सुरुवात होणार आहे. २० डिसेंबरपर्यंत हे अधिवेशन चालणार आहे. या अधिवेशनाच्या वेळापत्रकानुसार, चार दिवस सुट्टी आणि दहा दिवसांचे कामकाज असे दोन आठवड्यांत अधिवेशन पार पडणार आहे. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या कामकाज सल्लागार समितीची अधिवेशनापूर्वी बैठक होईल. यात अधिवेशनाचा कालावधी आणि कामकाजाची रूपरेषा ठरविण्यात येणार आहे.

# कायद्याच्या कसोटीवर टिकणारे मराठा आरक्षण देऊ -उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर : प्रतिनिधी**

ओबीसी जनगणनेच्या मागणीला आमचा विरोध नाही. याबाबतची भूमिका आम्ही आधीच स्पष्ट केली आहे. मराठा आरक्षणाबाबत टिकणारे आरक्षण देण्याची भूमिकासुद्धा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली आहे. त्यामुळे कोणताही निर्णय घेताना तो घाईत घेणार नाही, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि.२३) केले. नागपूर विमानतळावर ते पत्रकारांशी बोलत होते.



या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ओबीसी जनगणनेच्या मागणीला आमचा विरोध नाही. फक्त पद्धती काय असावी, हे ठरवावे लागेल. बिहारमध्ये या जनगणनेनंतर जी परिस्थिती निर्माण झाली तशी आपल्याकडे होऊ नये, याची काळजी राज्य सरकारला घ्यावी लागेल. त्यामुळे योग्य निर्णय याबाबत सरकार करेल.

मागच्या काळात आमच्याच सरकारने मराठा आरक्षण दिले होते ते उच्च न्यायालयात टिकले. आमच्या काळात सुप्रीम कोर्टातसुद्धा त्यावर स्थगिती आली नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आरक्षणाबाबत ठाम भूमिका घेतली आहे आणि आम्ही सारे त्यांच्या भूमिकेसोबत आहोत. घाईत कोणता निर्णय घेण्यापेक्षा कायद्याच्या कसोटीवर टिकणारे मराठा आरक्षण आम्ही देऊ, असेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

**सध्या राज्यात ६२ टक्के आरक्षण असून मराठा समाजाला उरलेल्या ३८ टक्क्यांमध्ये आरक्षण देण्याबाबत अभ्यास सुरू आहे. ओबीसीमधील आरक्षणाला धक्का न लावता आणि न्यायालयात टिकणारे आरक्षण देणार आहोत. एकदा जातनिहाय जनगणना होऊनच जाऊद्या, नेमकी आकडेवारी समोर येईल.**
**-अजित पवार, उपमुख्यमंत्री**




## पनवेल शहरात विकासकामांचा शुभारंभ

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरात सुमारे १८ कोटींहून अधिक रुपयांच्या विकास कामांचा शुभारंभ भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. २३) झाले.

पनवेल महपालिका हद्दीतील नागरिकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून त्यांचा दर्जा उंचवण्यसाठी भारतीय जनता पक्ष कटीबद्ध असून भाजप लोकप्रतिनीधींच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अनेक विकासाची कामे मार्गी लागत आहेत. त्यानुसार कल्पतरु कॉम्पलेक्स ते उरण नाका या मार्गाचे काँक्रिटीकरणासाठी १८ कोटी ५२ लाख एक हजार १९५ रुपये तर पनवेल महापालिकेच्या मालकीच्या मार्केट यार्ड येथील भुखंडावर प्ले ग्राऊंड विकसीत करण्यासाठी १९ लाख १६ हजार रुपये मंजूर झाले आहेत.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे तर प्ले ग्राऊंडच्या कामाचे भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते भूमिपूजन झाले.

या वेळी जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक अजय बहिरा, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, शहर खजिनदार संजय जैन, उपाध्यक्ष केदार भगत, भाजप नेते के. ए. म्हात्रे, उद्योजक मनोज आंग्रे, युवानेते मयुरेश खिस्मतराव, कल्पतरू सोसायटीचे अध्यक्ष प्रशांत ठाकूर, महेंद्र पाटील, सुमीत झुंझारराव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



# उरण शहरातील बाह्यवळण मार्गाचे काम वेगात



**उरण : रामप्रहर वृत्त**

शहरातील वाहतूक कोंडीवरील उतारा असलेल्या बाह्यवळण रस्त्याच्या कामाला वेग आला आहे. हा दुहेरी मार्ग २०२४मध्ये पूर्ण होणार आहे.

उरण शहराची कोंडी दूर करण्यासाठी सिडकोकडून उरभारण्यात येत असलेल्या बाह्यवळण मार्गाचे काम पावसातही सुरू होते. या एलव्हेटेड पुलाच्या १७पैकी ११ बीमचे काम झाले आहेत तर उर्वरित बीमचे काम दसऱ्यानंतर सुरू होणार आहे. त्यामुळे २०२४मध्ये हा मार्ग वाहतुकीसाठी खुला तर उरण-पनवेल रस्त्याकडील काही भागात वीज पुरवठा करणाऱ्या अतिउच्च दाबाच्या वाहिन्या जात असल्याने या वाहिन्यामुळे काम रखडले आहे. या संदर्भात महावितरण कंपनीने वाहिन्या हटविण्याची निविदा दिली आहे. त्यामुळे लवकरच शहराला जोडणाऱ्या बाह्यवळण मार्गाचे काम पूर्ण होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

यासाठी उरणचे आमदार महेश बालदी यांनी परवानग्या मिळाव्यात यासाठी प्रयत्न केले. त्यानंतर २०२२पासून या मार्गाचे काम सुरू करण्यात आले आहे.

## निवडक

### भारताचे फिरकीपटू बिशन सिंग बेदी यांचे निधन

**नवी दिल्ली** : ७०च्या दशकात भारतीय फिरकी आक्रमणाचा कणा ठरलेले महान फिरकीपटू बिशन सिंग बेदी यांचे सोमवारी (दि. २३) निधन झाले. ते ७७ वर्षांचे होते.



बिशन सिंग बेदी यांनी १९६७ ते १९७९ या काळात ६७ कसोटी सामन्यांमध्ये भारताचं प्रतिनिधित्व केले. आपल्या १३ वर्षांच्या क्रिकेट कारकिर्दीत त्यांनी २६६ विकेट्स घेतल्या.

### बांगलादेशमध्ये दोन रेल्वे धडकून २० जणांचा मृत्यू

**ढाका** : बांगलादेशमध्ये दोन रेल्वे एकमेकांना धडकल्या असून यात कमीत कमी २० लोकांचा मृत्यू झाला आहे. प्रवासी आणि मालवाहतूक रेल्वे एकमेकांना धडकल्याची माहिती आहे. राजधानी ढाकाजवळ कृष्णगंज जिल्ह्यातील ही घटना आहे. मृतांची संख्या वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. ढाका ट्रिब्यूनने यासंदर्भातील बातमी दिली आहे.

# खोपोलीत अज्ञात रोगाने मेंढ्या दगावल्या

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

पुणे केडगाव चौफुले येथून खंडू कोकरे हे आपल्या मेंढ्यांना खोपोली शहरात चार दिवसांपूर्वी आले, मात्र त्यांच्या कळपातील मेंढ्या अज्ञात रोगाने दगावल्याने त्यांच्यावर संकट ओढावले आहे.

खंडू कोकरे यांच्या कळपातील चार मेंढ्या चार दिवसांपूर्वी खोपोली येथे मुक्कामाच्या ठिकाणी मरण पावल्या. काहीतरी खाल्ल्याने या मेंढ्या मेल्या असाव्यात असा समज झाल्याने त्यांनी फार लक्ष दिले नाही. वनवठे येथे मुक्कामाला आले असताना मात्र सोमवारी सकाळी यातील काही मेंढ्या आजारी पडल्याचे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी लगेच वावोशी येथील पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधला. डॉ. नेत्रा आस्वार यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन तपासणी करेपर्यंत यातील १० ते १५ मेंढ्या मृत्यूमुखी पडल्या होत्या. डॉ. नेत्रा आस्वार यांनी खालापूर तालुका पशुधन विकास अधिकारी रोहिणी गायकवाड यांच्याशी संपर्क करून तत्काळ अन्य डॉक्टरांची



मदत मागविली.

तालुका पशुधन विकास अधिकारी रोहिणी गायकवाड यांनी सर्वच पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांसह वनवठे येथे धाव घेतली. या वेळी डॉ.नेत्रा आस्वार, डॉ.कोकरे, डॉ.काळे, डॉ. राजेंद्र गायकवाड, सहाय्यक म्हापणकर यांच्यासह मदतीसाठी आलेले रासपचे कार्यकर्ते भगवान ढेबे, संपत ढेबे, विजय ढेबे, रविंद्र बोडेकर, अरूण मोरे यांच्या मदतीने आजारी मेंढ्यांना उपचार करीत आहेत. सात मेंढ्या, दोन शेळ्या मरण पावल्याचे सांगण्यात आले.

**आजाराचे नक्की निदान लगेच समजू शकत नाही मात्र आम्ही प्रयत्न करीत आहोत. मेंढ्यांचे शवविच्छेदन केल्यानंतर नेमके काय झाले आहे ते समजेल.**
**-डॉ.रोहिणी गायकवाड, तालुका पशुधन विकास अधिकारी**

**या संकटात स्थानिकांनी व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी घेतलेली मेहनत वाखाणण्याजोगी आहे.**
**-भगवान ढेबे, सदस्य रासप**

## मालेगाव कोर्टात खासदार संजय राऊत सुनावणीस गैरहजर

**नाशिक : प्रतिनिधी**

मंत्री दादा भुसे यांनी खासदार संजय राऊतांवर अब्रुनुकसानीचा खटला दाखल केला आहे. याप्रकरणी संजय राऊत यांना सोमवारी (दि. २३) मालेगाव येथील न्यायालयासमोर हजर राहण्याचे आदेश दिले होते मात्र संजय राऊत गैरहजर राहिल्याने कोर्टाने संजय राऊत यांना ४ नोव्हेंबरची तारीख देण्यात आली आहे.

मालेगाव येथील गिरणा कारखान्यात मंत्री दादा भुसे यांनी १७८ कोटींचा भ्रष्टचार केला, असा आरोप शिवसेनेचे नेते खासदार संजय राऊत यांनी केला होता. त्यानंतर या बदनामी प्रकरणी दादा भुसे यांनी खासदार राऊत यांच्याविरोधात मालेगाव कोर्टात मानहानीचा दावा दाखल केला. त्याची सोमवारी सुनावणी होती.

## मुंबईतील आठ मजली इमारतीत अग्नितांडव

### दोघांचा मृत्यू, तीन जण जखमी

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील कांदिवलीमधील पश्चिम साईबाबा नगरमध्ये वीणा संतूर बिल्डिंगमधील ग्राऊंड फ्लोअरला सोमवारी (दि. २३) आग लागली. आग लागल्याची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाच्या पाच गाड्या दाखल झाल्या होत्या. या घटनेत दोघांचा मृत्यू झाला असून तीन जण जखमी झाले आहेत.

कांदिवलीमधील पश्चिम साई बाबा नगरमधील वीणा संतूर इमारतीत सोमवारी दुपारी १२.२७ वाजण्याच्या सुमारास आग लागली होती. ही आग इमारतीमधील इलेक्ट्रिक वायरिंगमध्ये बिघाड झाल्याने लागल्याची माहिती समोर आली आहे. अग्निशमन दलाच्या एकूण पाच गाड्या घटनास्थळी पोहचल्या असून आग विझवण्याचे काम सुरू होते. या आगीच्या घटनेत लक्ष्मी बुरा, राजेश्वरी भराटे आणि रंजन शाह या जखमी झाल्या आहेत. यापैकी लक्ष्मी बुरा या ४५ ते ५० टक्के तर रंजन शाह या ४५-५० टक्के भाजल्या आहेत, तर राजेश्वर भराटे या १०० टक्के भाजले आहेत, तर ग्लोरी वालफटी (वय ४३) आणि जोसू जेम्स रॉबर्ट (वय ८) या दोघांचा मृत्यू झाला आहे.

या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर लागलेल्या आगीची झळ वरील मजल्यांनादेखील बसली आहे. आग लागल्यानंतर इमारतीमधील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.







पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडलक्लास हौसिंग सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने झंकार नवरात्रोत्सव २०२३चे आयोजन करण्यात आले आहे. उत्सवाच्या आठव्या दिवशी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांच्या पत्नी शकुंतला ठाकूर यांच्यासह भेट देत देवीचे दर्शन घेतले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, अर्चना परेश ठाकूर, माजी नगरसेवक मनोज भुजबळ, अजय बहिरा, राजू सोनी, माजी नगरसेविका राजेश्री वावेकर, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, स्वप्नील ठाकूर, छाया म्हात्रे, पूनम ठाकूर, नीता पाटील, अजय पाटील, केदार भगत, संजय गुप्ता, हर्ष गुप्ते, मानिक सर आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आठव्या दिवसाच्या विजेत्या स्पर्धकांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.



# राज्यातील वायू प्रदूषण वाढतेय; हवेची गुणवत्ता पातळी खालवली

## केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाची आकडेवारी समोर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात मुंबई, पुणे या मोठ्या शहरातील वायू प्रदूषणात सातत्याने वाढ होत असल्याचे समोर आले आहे, परंतु आता फक्त मुंबई, पुणे नाही तर राज्यातल्या अनेक शहरांमधील हवा गुणवत्ता खालवल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे.

मागील २४ तासांत राज्यातल्या अनेक शहरांचा हवा गुणवत्ता निर्देशांक समाधानकारक श्रेणीतून मॉडरेट (मध्यम) श्रेणीत गेला आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीवरून हे चित्र स्पष्ट झाले आहे.

मागील २४ तासांत राज्यातल्या अनेक शहरात प्रदूषक पीएम २.५, पीएम १०च्या धुलिकणांच्या मात्रेत वाढ झाल्याचे चित्र आहे.



पुण्यात एनओ२ तर जालन्यात ओ३ प्रदूषकाची मात्रा वाढली आहे. उल्हासनगर परिसरात हवा गुणवत्ता वाईट श्रेणीत, एक्यूआय २१३वर तर जळगावात एक्यूआय १९९वर आहे. पूर्वेकडून येणारे वारे, वाऱ्यांची कमी गती, तापमानात होणारी घट आणि डस्ट लिफ्टींगमुळे हवा गुणवत्ता बिघडली आहे. मुंबई महापालिकेकडून हवा गुणवत्ता सुधारण्यासाठी उपाययोजना करण्यास सुरुवात झालीय त्यानंतर मुंबईतील हवेच्या निर्देशांकात सुधारणा झाल्याचे चित्र दिसत आहे.

### दिल्लीत पुन्हा परिस्थिती नियंत्रणाबाहेर :

*मागील काही दिवसांत दिल्लीतील हवेची गुणवत्ता मुंबई, पुण्यापेक्षा चांगली परिस्थिती पहायला मिळत होती. दिल्लीत झालेल्या पावसाने परिस्थिती सुधारली होती, मात्र पुन्हा परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्याचं चित्र आहे. दिल्लीतील हवा गुणवत्ता निर्देशांक ३०६वर म्हणजे अतिशय वाईट श्रेणीत गेल्याचे पहायला मिळत आहे.*

# मुंबई विभागीय शालेय वुशू स्पर्धेत रामशेठ ठाकूर विद्यालयाचे सुयश





**खारघर : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवकसेवा संचलनालय अंतर्गत मुंबई उपनगर क्रीडा अधिकारी व मुंबई महानगरपालिका व ऑल मुंबई सबरबन वुशू असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार २१ व रविवार २२ ऑक्टोबर रोजी शालेय विभागस्तरीय वुशू स्पर्धांचे आयोजन बृहन्मुंबई महानगर पालिका गुंदवली शाळा, बिमा नगर अंधेरी येथे करण्यात आले होते. या स्पर्धा १७ व १९ वर्षाखालील मुले व मुली यांच्या वयोगटात घेण्यात आल्या. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन उज्ज्वल यश संपादन केले आहे.

१७ वर्षांच्या मुलांच्या गटात राहुल सिंग (नववी) याने ६० कि. वजन गटात रौप्य पदक, मयुरेश चौधरी (दहावी) याने ५२ कि. वजन गटात रौप्य पदक, तर पार्थ घरत (दहावी) वी याने ५६ कि. गटात रौप्य पदक मिळविले तर १९ वर्षाच्या मुलींच्या गटात मिसबा बेबल (बारावी) हिने ६३ कि. वजन गटात सुवर्ण पदक, कस्तुरी शिंदे (बारावी) हिने ७० कि. गटात सुवर्ण पदक मिळविले. तर सानिया शेख (बारावी) हिने ५६ कि. गटात कांस्यपदक मिळविले.

या स्पर्धेमध्ये रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दोन सुवर्ण पदके, तीन रौप्य पदके व एक कांस्य पदक अशी एकूण सहा पदके जिंकून रामशेठ ठाकूर विद्यालयाचे नाव मुंबई विभागस्तरावर चमकविले आहे. यातील सुवर्ण पदक मिळविणाऱ्या विद्यार्थीनींची अमरावती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय वुशू स्पर्धेकरीता निवड झाली आहे. या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या क्रीडा शिक्षकांचे पालक व सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक प्रविण पाटील, संभाजी जाधव यांचे उत्कृष्ट मार्गदर्शन लाभले.

या चमकदार कामगिरीबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य संजय भगत, सचिव मा. डॉ. एस. टी. गडदे, उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या निशा नायर, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य प्रभाकर जोशी व माध्यमिक विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक संतोष खांदेकर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद व सर्व विद्यार्थ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# पदवीधर मतदारसंघाच्या नोंदणीसाठी विशेष शिबिर

**मुंबई : प्रतिनिधी**

विधानपरिषदेत पदवीधर मतदार संघात मतदानासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी मंत्रालयासह मुंबईत १२ ठिकाणी मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयाने तीन दिवसीय मतदारनोंदणी शिबिराचे आयोजन केले आहे. जास्तीत जास्त पदवीधर मतदारांनी नोंदणी करण्याचे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी केले आहे.

मंत्रालयीन कर्मचाऱ्यांना नोंदणी करण्यासाठी त्रिमुर्ती प्रांगणात ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने २३,२५ व २६ ऑक्टोबर कालावधीत तीन दिवसीय जनजागृती शिबिराचे



आयोजन करण्यात आले आहे. शिबिराच्या उद्घाटनाला मुख्य निवडणूक अधिकारी देशपांडे बोलत होते. या वेळी मुंबई शहरचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रवींद्र राजपूत, पदनिर्देशित अधिकारी डॉ. विजयकुमार सुर्यवंशी यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

मतदार यादीत नाव नोंदविण्यासाठी ३० सप्टेंबर ते ६ नोव्हेंबर आणि २३ नोव्हेंबर ते ९ डिसेंबर २०२३ या कालावधीत ऑफलाईन आणि ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करता येणार आहे. ऑनलाईन नोंदणीसाठी http://gterollregistration.mahait.org या संकेत स्थळास भेट देऊ शकता. या शिबिरात कोकण आणि मुंबई मतदारसंघातील पदवीधर मतदार नोंदणी करू शकणार असल्याची माहितीही मुंबई शहरचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी दिली.

मुंबई जिल्ह्यातील वस्तू व सेवा कर विभाग भायखळा, जे.जे. हॉस्पिटल, जी.टी. हॉस्पिटल, कामा हॉस्पिटल, सेंट जॉर्ज हॉस्पिटल, श्रीमती नाथाबाई ठाकरसी महिला विद्यापीठ, मरीन लाईन, मध्य रेल्वे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनंस, पश्चिम रेल्वे, चर्चगेट, आर.बी.आय. फोर्ट, सह आयुक्त मुंबई महानगर पालिका या विविध १२ शासकीय कार्यालयांमध्ये या तीन दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

## आज अवजड वाहनांना बंदी

**नवी मुंबई : बातमीदार**

दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. देवी विसर्जनादरम्यान होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी मंगळवारी (दि. २४) सकाळी ७ ते बुधवारी सकाळी ७ वाजेपर्यंत अवजड वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये रस्त्यांवर होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी मंगळवारी सकाळी ७ वाजल्यापासून ते बुधवार सकाळी ७ वाजेपर्यंत नवी मुंबई कार्यक्षेत्रातून बृहन्मुंबईच्या व ठाणे हद्दीत जाणाऱ्या तसेच बृहन्मुंबईच्या व ठाणे हद्दीतून नवी मुंबईत प्रवेश करणाऱ्या सर्व अवजड वाहनांना प्रवेश करण्यास निर्बंध घालून तशी अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे. ही वाहतूक नियंत्रण अधिसूचना ही जीवनावश्यक वाहने, पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या बसेस व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

# उलवे नोडमध्ये 'आयएमए'ची नवीन शाखा




**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

इंडीयन मेडीकल असोसिएशन (आयएमए) ही डॉक्टरांसाठी काम करणारी देशातील सर्वांत मोठी संस्था आहे. या संस्थेच्या नवीन शाखेचा शुभारंभ सोहळा उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्पलेक्समध्ये झाला.

इंडीयन मेडीकल असोसिएशनच्या शाखेचे तसेच माजी नॅशनल प्रेसिडेंट विजय अग्रवाल यांच्या हस्ते झाले. या वेळी उलवेच्या शाखेची २०२३-२४ करता कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून यामध्ये प्रेसिडेंट म्हणून डॉ. विकास मोरे तर सेक्रेटरी म्हणून डॉ. कृष्णा बोरकर यांनी निवड करण्यात आली. या कार्यक्रमावेळी महाराष्ट्र इंडीयन मेडीकल असोसिएशनचे प्रेसीडेंट डॉक्टर रवींद्र कुटे, नॅशनल व्हाईस प्रेसिडेंट डॉ. शिवकुमार उत्तुरे, आओ गाव चले कमीटीचे व्हाईस चेअरमन डॉ. अनिल पाचनेकर यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, सदस्य आणि मान्यवर उपस्थित होते.

## निवडक

### गळफास घेऊन आत्महत्या

**पनवेल :** अज्ञात कारणावरून राहत्या घरात हॉलमधील सिलिंग फॅनला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना करंजाडे येथे घडली आहे. धीरज जाधव (वय २४) असे या तरुणाचे नाव असून त्याने अज्ञात कारणावरून सिलिंग फॅनला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना करंजाडे येथे घडली आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल :** अज्ञात वाहनचालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवून एका ६२ वर्षीय व्यक्तीस धडक देऊन झालेल्या अपघातात एका व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पनवेलजवळील देवळोली गावाच्या बाहेर येणाऱ्या रस्त्यावर घडली आहे. रमण कांबळे (वय ६२) यांना देवळोली गावाच्या बाहेर येण्याच्या रस्त्यावर महिंद्रा सेन्चुरीओ दुचाकीवरील चालकाने धडक दिल्याने झालेल्या अपघातात ते गंभीररित्या जखमी होऊन त्यात त्यांचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नवीन पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# राजू सोनी यांच्यातर्फे मंदिराचे नूतनीकरण

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेचे माजी नगसेवक राजू सोनी यांनी सामाजिक बांधिलकी जपत स्वखर्चातून ४० वर्षे जुन्या मंदिराचे नूतनीकरण केले आहे. त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात येत आहे.

कोणतीही देणगी न घेता स्व खर्चाने नवनाथ नगर रेल्वे स्टेशन रोड येथील वाघरी समाज यांचे ४० वर्षांपूर्वीचे जुने दुर्गा माता मंदिरामध्ये माजी नगरसेवक राजू सोनी यांनी सर्व मंदिराचे नवीन काम करून दिले तसेच वर पत्र्याची नवीन शेड बनवून दिली नवीन टाइल्स बसवण्यात आल्या आहेत. त्याबद्दल त्यांचे पनवेल शहरातील सर्व झोपडपट्टीवासीयांनी तसेच सर्व महिला भगिनी व नागरिकांनी आभार मानले आहेत.

राजू सोनी यांनी आत्तापर्यंत लक्ष्मी वसाहत येथील लक्ष्मी आई मंदिर, दुर्गा माता मंदिर व श्री मारुती मंदिर, इंदिरानगर येथील यल्लमा माता मंदिर, रेणुका माता मंदिर, नवनाथ



नगर दुर्गा माता मंदिर, असे पनवेल शहर व पनवेल तालुक्यातील बऱ्याच मंदिरांसाठी देणगी दिली आहे. त्याबद्दल त्यांचे पनवेल महानगर झोपडपट्टी व जीर्ण चाळी स्थानिक रहिवासी संघटना अध्यक्ष तथा शिवसेना पनवेल तालुकाप्रमुख भरत जाधव, ज्येष्ठ शिवसैनिक महावीर भाई गुप्ता यांनीही राजू सोनी यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# 'दिशा'तर्फे नवदुर्गा पुरस्कार, दांडिया

**पनवेल : वार्ताहर**

दिशा कल्चरल इव्हेंट प्रस्तुत दिशा महिला मंच आयोजित नवदुर्गा पुरस्कार व जागर आई दुर्गेचा, जल्लोष रास दांडिया कार्यक्रमाचे आयोजन खांदा कॉलनी येथील बेल्लेझा बँक्वेट हॉल येथे करण्यात आले होते.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून दादासाहेब फाळके यांचे नातू चंद्रशेखर पुसाळकर व मृदुला पुसाळकर, आर. के. ग्रुपचे डायरेक्टर राजेंद्र कोलकर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते वेगवेगळ्या क्षेत्रातील कर्तृत्वान महिलांना सन्मानित करण्यात



आले. पटेल ज्वेलर्सकडून आलेल्या सर्व महिलांना भेटवस्तूही देण्यात आली.

या वेळी पटेल ज्वेलर्सच्या जनरल मॅनेजर प्रतीक्षा डायेस, ओरोस्माईल डेंटल क्लिनिकच्या डॉ. शिल्पा भंडारवार व डॉ. अमित भंडारवार, देवकी मिडिया इव्हेंट मॅनेजमेंट, ॲडव्हरटाईझ व आयटी सोल्यूशन्स कंपनीचे डायरेक्टर साहिल रेळेकर, प्रतीक फोटोग्राफीचे प्रतीक चव्हाण, समाजिक कार्यकर्ता सुरेश मोरे यांनी सहकार्य केले.

या वेळी शॉर्ट फिल्म डायरेक्टर तेजस पाटील, अभिनेत्री प्रीती गायकर, अंजली साखरे, किरण राजपूत, संस्थेच्या अध्यक्ष निलम आंधळे, उपाध्यक्ष विद्या मोहित आदी उपस्थित होते.



नवीन पनवेल : पद्मनाभ व मुग्धा भागवत यांच्या घरी विराजमान देवीचे युवोन्मेष समुहाने दर्शन घेतले.



पनवेल : नवरात्रीमध्ये अष्टमीच्या रात्री कुलाचाराप्रमाणे तांदूळाच्या पिठापासून तयार करण्यात आलेली महालक्ष्मी.



पनवेल : ग्रेटर खांदा येथील दीप व दिप्ती महाजन यांनी नवरात्रोत्सवानिमित्त कुमारिका पूजन केले.

# खेलो इंडिया पश्चिम विभाग स्पर्धेत स्नेहल माळीला दोन सिल्व्हर मेडल

**पनवेल : वार्ताहर**

खेलो इंडिया पश्चिम विभाग स्पर्धेत रायगडची कन्या स्नेहल माळीने दोन सिल्व्हर मेडल पटकावत जिल्ह्याला नावलौकिक मिळवून दिले आहे. स्नेहलने चकमदार कामगिरी केल्याबद्दल तिचे पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर व माजी सभागृह नेते नगरसेवक परेश ठाकूर यांनी आभिनंदन केले आहे.

केंद्र सरकारच्या खेलो इंडिया अंतर्गत सुरू असलेल्या पश्चिम विभाग वुमन्स सायकल लिग स्पर्धेत सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेत अनेक राष्ट्रीय, राज्य स्तरावरील पदक विजेते खेळाडू हे बारामती येथे झालेल्या स्पर्धेत सहभागी झाले.




यात रायगड जिल्ह्यातील स्नेहल शत्रुघ्न माळी हिने टाईप ट्रायल १० किमी व मास स्टार्ट ३० किमी या दोन प्रकारात दोन सिल्व्हर मेडल पटकवले आहेत.

स्पर्धेचे बक्षीस सभारंभ भारताचे महिला व्हॉलीबॉल संघाचे कर्णधार निर्मल तनवर यांचे हस्ते पार पडले तर शरयु मोटर्सचे संचालक शर्मिला पवार यांचे हस्ते उद्घाटन झाले. सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष प्रताप जाधव, महाराष्ट्र सायकलिंग असोसिएशनचे संजय साठे, राष्ट्रीय महिला प्रशिक्षक दिपाली पाटील व फिनिक्स सायकलिंग क्लबचे प्रशिक्षक दर्शन बारगुजे यांचे मार्गदर्शन स्नेहलला लाभले आहे. या तिच्या यशाबद्दल सर्व स्तरावरून तिचे अभिनंदन होत आहे.

दरम्यान, गुजरात येथे होणारे नॅशनल खेलो इंडिया स्पर्धेत स्नेहल ही पश्चिम विभाग वुमन्स सायकल (महाराष्ट्र, राजस्थान, छत्तीसगड, गोवा कर्नाटक, गुजरात) या राज्यांतर्फे प्रतिनिधीत्व करणार आहे. स्नेहल शत्रुघ्न माळी ही पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी यांची कन्या आहे.

# शिवतेज मित्र मंडळातर्फे रक्तदान शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**

शिवतेज मित्र मंडळ गंगानगर नेरळच्या वतीने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या वेळी एकूण ५७ दात्यांनी रक्तदान करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले ४८४वे रक्तदान शिबिर ठरले.

रक्तसंकलनाचे काम घाटकोपर येथील समर्पण रक्तसंकलन केंद्र यांचे डॉ. एम. ए. शेख, धनश्री लाड, लता देशक, संजय ठोंबरे, पीयुष सिंघ, अनिकेत जाधव, साहिल पवार, सनी मोरे, शुभम जगताप व कृष्णा साठे आदींनी केले. या वेळी आमिर मणियार, प्रज्ञेश खेडकर तसेच शिवतेज मित्र मंडळाचे तुषार म्हात्रे, मयूर कांबरी, वासुदेव गवळी, संदेश जाधव, मितेश भोईर, नितीन मनवे, पवन सोनावळे, प्रतीक सोनावळे, निवृत्ती कांबरी, रोशन सातवी आदी उपस्थित होते.



## आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून

# पनवेल पोलिसांच्या धाडसी कारवाईचे कौतुक





**पनवेल : रामप्रहर वृत्त**


अत्यंत गुंतागुंतीच्या सायबर गुन्हयाची शिताफीने आणि धाडसाने उकल करत सहा नायजेरियन सायबर गुन्हेगारांना दिल्लीतून जेरबंद करणाऱ्या पनवेल पोलिसांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी (दि. २३) अभिनंदन व कौतुक केले. सोशल मीडियाच्या माध्यमातून ओळख करत भेटवस्तूच्या आमिषाने पनवेलमधील एका महिलेची तब्बल तीन लाख २५ हजार ५०० रुपयांची ऑनलाईन पद्धतीने नायजेरिन सायबर गुन्हेगारांकडून एक महिन्यापूर्वी आर्थिक फसवणूक झाली होती. त्या अनुषंगाने या गुन्ह्याची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरिक्षक नितीन ठाकरे यांनी या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी पोलीस तपास यंत्रणा कार्यान्वित केली. ऑनलाईन सायबर गुन्हा असल्याने त्या संदर्भात योग्य तपास दिशा मिळण्यासाठी सायबर तज्ज्ञांची मदत घेण्यात आली. सायबर गुन्हेगार तांत्रिकदृष्ट्या अनेक आधुनिक उपकरणांची मदत घेऊन लोकांची आर्थिक फसवणूक करत असतात. त्यामुळे सायबर गुन्हेगारांना जेरबंद करण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरिक्षक नितीन ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली व्यूहरचना आखण्यात आली.

१८ पोलीस आणि सायबर तज्ज्ञ अशी टीम बनविण्यात आली. तपासाच्या अनुषंगाने गुन्हेगारांचे केंद्र दिल्ली जवळ असल्याचे या टीमच्या निदर्शनास आले. त्यानुसार गुन्हेगारांना पकडण्यासाठी पनवेलहून हि टीम दिल्लीला रवाना झाली. त्यांनी तब्बल दहा दिवस दिल्लीमध्ये शोध मोहीम घेतली. सायबर गुन्हेगार हे हत्यारांचा वापर करणारे असल्याची शक्यता दाट असते. त्यामुळे त्याची दक्षता घेणे गरजेचे असते. त्या अनुषंगाने पोलिसांच्या टीमने तपास यंत्रणेला आपल्या चाणाक्ष बुद्धीने वेग दिला आणि मोठे धाडस करून सहा आरोपींना अटक केली.

विशेष म्हणजे हे आरोपी सर्व नायजेरियन निघाले. पोलिसांच्या या टीमने केलेल्या कारवाईने सराईत सायबर गुन्हेगार तर जेरबंद झालेच त्याचबरोबर पोलिसांनी केलेल्या या धाडसी कामगिरीने पनवेल पोलिसांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. त्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरिक्षक नितीन ठाकरे व त्यांच्या टीमचे विशेष कौतुक केले.

**या घटनेचा छडा**

फसवणूक झालेल्या महिलेने दिलेल्या माहितीनुसार, १० ऑगस्ट २०२३ रोजी फेसबुकवर अतुल कुमार या नावाने अनोळखी व्यक्तीकडून आलेली फ्रेंड रिक्वेस्ट मान्य केली. त्यानंतर सोशल मीडियातून संपर्क वाढल्यानंतर अतुल कुमार नामक व्यक्तीने भेटवस्तू पार्सलने पाठपून त्यासाठी कस्टम क्लिअरन्स फी म्हणून २५ हजार रुपये भरण्यास सांगून युके करन्सी हि रुपयांमध्ये ट्रान्सफर करून घे असे सांगितले मात्र ते पैसे भरले नाहीत. त्यानंतर २३ सप्टेंबर २०२३ रोजी एका महिलेने आपण इंदिरा गांधी विमानतळावरून बोलत असल्याचे सांगून तुमचे युके वरून पार्सल कस्टम क्लिअरिंग फी साठी बाकी असल्याचे सांगितले. त्यामुळे मी २५ हजार रुपये क्लेअरिंग फी म्हणून तिने दिलेल्या बँक खात्यावर जमा केले. त्यानंतर पुन्हा एकदा त्या महिलेने पार्सल स्कॅनिंगमध्ये युके करन्सी असल्याने त्यासाठी ०१ लाख रुपये क्लिअरन्स फी भरावे लागतील असे सांगितले. अशा प्रकारे वेगवेगळ्या क्लुप्त्या करत एकूण तीन लाख २५ हजार ५०० हजार रुपयांची फसवणूक झाली, असल्याचे सांगितले तसेच पोलिसांनी केलेल्या तपास कारवाईमुळे त्यांनी पोलिसांचे आभार व्यक्त केले.



**खारघर : श्री महालक्ष्मी वेल्फेअर असोसिएशन, सिध्दी प्रतिष्ठान, लॉड्री असोसिएशन खारघर, नाकोडा मित्र मंडळ आणि श्री सिद्धिविनायक उत्सव मित्र मंडळ, खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन खारघर सेक्टर १९ मध्ये सोमावरी आयोजित करण्यात आला होता. या शिबिराला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देऊन रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांना सन्मानीत केले. टाटा मेमोरियल सेंटरच्या सहाकार्यने हे शिबिर आयोजीत करण्यात आले असून, या वेळी गुरु ठाकूर, फुलाजी ठाकूर, अशोक अच्छा, महेश तलरेजा, हनुमंत पवार, लविष जैन, मनीष जैन, सर्वेश ठाकूर आदी उपस्थित होते.** (छाया : अक्षय शार्दुल)




**तळोजा : भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी प्रल्हाद केणी व निर्दोष केणी यांच्या वतीने आयोजित नवरात्रोत्सवाला भेट दिली. या वेळी लकी ड्रॉ काढण्यात आला. यात आदिवासी मुलगी अंकिता पवार हिला सायकल बक्षीस देण्यात आली.**




**तळोजा : भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी व निर्दोष केणी यांच्या वतीने आयोजित नवरात्रोत्सवामध्ये रंगला खेळ पैठणीचा कार्यक्रम झाला. या वेळी प्रमुख पाहुण्या म्हणून अर्चना परेश ठाकूर, पूनम भूषण ठाकूर, यांची उपस्थिती लाभली. या वेळी निवेदक विवेक पोरजी, प्रतीक्षा प्रल्हाद केणी, आशा बोरसे, सुरेखा केणी, सरिता केणी, नीलम केणी, विजयश्री पाटील, शकुंतला पाटील, भारती घरत आदी उपस्थित होते. कोमल चव्हाण ह्या पैठणी व २५ हजार रुपयांच्या मेकअप बॉक्सच्या मानकरी ठरल्या.**

## सीकेटी विद्यालयात भोंडला



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दरवर्षी प्रमाणेच या ही वर्षी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालाय इंग्रजी माध्यमात नवरात्रनिमित्त सरस्वती पूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी देवीची आरती केली. शालेय गायकवृंदाने अप्रतिम जोगवा सादर केला. दक्ष ठोंबरे आणि स्वर म्हात्रे यांनी गोंधळ गीते सादर केली. अक्षया वर्तक आणि श्रेया कोलापकर या विद्याथिनींनी अंबेमातेचे एक नृत्य करून उपस्थितांची मने जिंकली.

या वेळी पर्यवेक्षिका निरजा अदुरी यांनी नवरात्रीचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले. आठवीच्या मुलींचा भोंडला या वेळी सादर केला गेला. भोंडला, भुलाबाईची गाणी किंवा हादगा हे महाराष्ट्रात नवारात्री दरम्यान खेळले जाणारे विशेष खेळ असून ही परंपरा पुढील पिढीला सोपवणे महत्त्वाचे आहे. म्हणूनच स्वाती काळे, मनिषा नारखेड आणि पूर्वा खेडेकर या शिक्षिकांनी विशेष मेहनत घेऊन हा भोंडला सर्व विद्यार्थ्यांसमोर सादर केला. महाराष्ट्राची परंपरा जपणारा हा भोंडला या कार्यक्रमाचे खास वैशिष्टय ठरला. आठवीच्या विद्यार्थ्यांनी हा भोंडला अतिशय उत्कृष्टपणे सादर केला.

मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी या कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षक यांचे आपल्या भाषणात कौतुक केले. कार्यक्रमाला मुख्याध्यापक संतोष चव्हाण, इंग्रजी प्राथमिकच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# जैन समाजासाठी स्वतंत्र आयोग स्थापन करण्याची मागणी

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून निवेदन सादर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जैन समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी तसेच सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र आयोगाची स्थापना करण्याची मागणी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांना निवेदनाद्वारे केली आहे. यासंदर्भात पनवेलमधील जैन समाजाच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे मागणी केली होती.

जैन समाजाच्या न्याय्य हक्कासाठी तसेच सर्वांगिण विकासासाठी स्वतंत्र आयोगाची स्थापना करण्याची मागणी संजय जैन, विनोद बाफना आणि राकेश खाटेड यांच्या मार्गदर्शनाखाली जैन समाजाने आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेऊन केली होती. जैन समाज हा पारंपारीक उद्योग व व्यापारामध्ये अग्रणी असून, त्या निमित्ताने देशाच्या विविध भागात विखुरलेला आहे. हा समाज शांतीप्रिय समाज म्हणून ओळखला जातो. वरकरणी जरी सक्षम वाट असलेल्या या समाजामध्ये ४० टक्के घटक हा मध्यमवर्गीय ४० टक्के निम्न मध्यमवर्गीय आणि १० टक्के घटक हा दारिद्र्यरेषेखाली आहे. समाजातील एक मोठा घटक आर्थिकदृष्टया दुर्बल असल्यामुळे या घटकातील कुटुंबाचे तसेच या कुटुंबातील विद्यार्थ्यांचे आर्थिक सक्षमीकरण होणे गरजेचे वाटते. तसेच जैन समाज शांतताप्रिय असल्याने, या समाजास वेळोवेळी सामाजिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने, समाजाचे सामाजिक सक्षमीकरणही आवश्यक वाटते.

जैन समाजाकरीता राज्यात स्वतंत्र आयोगाची स्थापना करावी असे या निवेदनात नमूद करण्यात आले असून ती प्रत जैन समाज बांधवांना सोमवारी देण्यात आली.





**पनवेल : भाजप नेरे पंचायत समिती विभागीय अध्यक्षपदी राजेश भोईर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भोईर यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.**

# सीकेटी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस, कॉमर्स आणि सायन्स कॉलेजमध्ये डॉ. सी. डी. देशमुख स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राद्वारे पनवेल महानगरपालिका भरतीच्या पूर्वतयारीसाठी मार्गदर्शन वर्गाचे आयोजन केलेले आहे. पनवेल महापालिकेमध्ये विविध प्रकारच्या ३७७ पदांच्या नोकर भरतीसाठी ऑनलाईन परीक्षा घेतल्या जाणार आहेत. या भरतीच्या सर्व परीक्षांची योग्य तयारी करून घेण्यासाठी विशेष प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रशिक्षण वर्गात मराठी, गणितीय व सांख्यिकीय अभियोग्यता, बुद्धीमापन, इंग्रजी भाषा आणि सामान्य ज्ञान या विषयांची तयारी करून घेतली जाणार आहे. याकरिता तज्ञ व अनुभवी मार्गदर्शकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.सदर भरती दहावी/बारावी, पदवीधर आणि तांत्रिक पदांसाठी असल्याने ज्या उमेदवारांनी अर्ज केला आहे ते सर्व उमेदवार प्रशिक्षण वर्गास प्रवेश घेऊ शकतात. या मार्गदर्शन वर्गास प्रवेश घेऊन संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. संजय के. पाटील सर व डॉ. सी. डी. देशमुख स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक विजयेंद्र शितोळे यांनी केले आहे.

प्रशिक्षण वर्गाच्या प्रवेशाकरिता खालील लिंकवरून ऑनलाईन अर्ज भरून २८ ऑक्टोबर २०२३पर्यंत आपला प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. https://docs.google.com/forms/d/e/1F-IpQLSfCYYQDXX1FnlHR1rtthcfxtn20kkK3fJVxPB3tvRZwjVC5eQ/viewform?usp=sfšlink अधिक माहितीसाठी ९२२३५५५७७९, ९८३३१७७५५१ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.






**पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान पनवेल विभागाच्या वतीने आयोजित दुर्गामाता दौड या धार्मिक उपक्रमाची नववी माळ विचुंबे गाव परिसरात गुंफण्यात आली. या दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. युवकांसोबतच नागरिक, महिला, लहान मुले दौडमध्ये सहभागी झाले होते.**



**पनवेल : नुकतेच भाजपमध्ये प्रवेश केलेले देवद ग्रामपंचायतीमध्ये बिनविरोध निवडून आलेले सदस्य आकांक्षा रसाळ आणि कनकेश्वर रसाळ यांनी भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांची भेट घेतली. या वेळी उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी जि. प. सदस्य अमित जाधव, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, सुनील पाटील, निलेश वाघमारे, वामन वाघमारे, संदीप वाघमारे, विजय वाघमारे, वासुदेव वाघमारे, कैलाश वाघमारे, सचिन वाघमारे, सागर वाघमारे, आकाश साळवी आदी उपस्थित होते.**

## ‘सीकेटी’त रोबोटिक्सचे प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमात शनिवारी (दि. २१) विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या रोबोटिक्स प्रकल्पांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. यावर्षीपासून रोबोटिक्स हा ननीन विषय विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आला आहे.



दर आठवड्यात एक तासिका रोबोटिक्स या विषयासाठी देण्यात आलेली आहे. शालेय जीवनानंतर ज्यांना आय.टी क्षेत्रात करिअर करायचे आहे त्या विद्यार्थ्यांसाठी रोबोटिक्स हा विषय अत्यंत उपयोगी आहे. म्हणूनच विद्यार्थ्यांनी एकूण १२ प्रकल्प बनविले. व्हॉईस कंट्रोल कार, ब्लाईंट स्टिक, ॲटोमॅटिक टॅप, आर. सी. कार असे वैविध्यपूर्ण प्रकल्प हे या प्रदर्शनाचे वैशिष्टय होते. पालकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन समाधान व्यक्त केले.

## त्वरीत जागा भरणे आहे

एका नामांकित साडी शोरूमसाठी
लेखापालाची (अकाऊन्टट) एक जागा भरणे आहे.
स्त्री/पुरूष असेल तर चालेल अनुभव असल्यास प्राधान्य...

संपर्क :- मो. ९०४९७७७५४४ / ८१०४२०७७९३

## संपादकीय

# दसरा सण मोठा

**नऊ वर्षांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची सूत्रे स्वीकारली, तेव्हाच खरे तर देशाने सीमोल्लंघन केले. त्यानंतर दरवर्षी यशाची शिखरे पादाक्रांत करत आपला देश शिलंगणाला निघाला आहे. मोदी सरकार देशाची प्रतिमा अधिकाधिक उज्ज्वल करण्याच्या प्रयत्नात असताना विरोधीपक्ष मात्र बेलगाम आरोप करण्यात मशगुल आहेत. महाराष्ट्राला पुरते लुटून झाल्यावर आता यांना कुठल्या विचारांचे सोने लुटायचे आहे हे त्यांचे त्यांनाच ठाऊक. दररोज खालच्या पातळीवर जाणारे राजकारण आणि निंदानालस्ती यांच्या रावणाचे यंदा दहन होवो अशीच प्रार्थना केली पाहिजे.**

कृषीप्रधान संस्कृतीतून झिरपलेल्या सणवारांपैकी एक महत्त्वाचा सण म्हणजे दसरा. विजयादशमी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या सणाला भारतीय संस्कृतीमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. साडेतीन मुहुर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या शुभदिवशी चांगल्या गोष्टींचा प्रारंभ करण्याची प्रथा आहे. अक्राळविक्राळ समस्यांच्या दहातोंडी रावणाचे दहन करून नव्याने सीमोल्लंघन करण्याची या दिवसाची परंपरा आहे. आपल्या देशाची अफाट लोकसंख्या आणि ब्रिटिश राजवटीपासून दुर्लक्षित राहिलेल्या अनेक समस्यांमुळे आज सगळेच काही आलबेल नाही हे तर आपण सारेच जाणतो, परंतु स्वातंत्र्यानंतरच्या दीर्घ काळात करायच्या राहून गेलेल्या अनेक बाबी मार्गी लावण्याचा प्रामाणिक प्रयत्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने सत्ता हाती आल्यापासून चालविला आहे हेही जनता मनोमन जाणते आणि म्हणूनच पंतप्रधान मोदी यांची लोकप्रियता विरोधकांनी कितीही रान उठविले तरीही आजही तशीच टिकून आहे. महाराष्ट्रातील शिंदे-फडणवीस-पवार सरकारही गोरगरीबांकरिता सणासुदीचे दिवस आनंदाचे जावोत यासाठी प्रयत्नशील असून सर्व गरजूंच्या घरी 'आनंदाचा शिधा' पोहचविला जाणार आहे. दुर्दैवाने महाराष्ट्रातील राजकीय वातावरण गेले अनेक महिने अतिशय गढुळलेले असल्यामुळे जनतेच्या मनातही संभ्रमाचे ढग दाटलेले आहेत. येत्या काही दिवसांत यातही सकारात्मक बदल होवो अशीच प्रार्थना जनता करीत असेल. गेली काही वर्षे नैसर्गिक संकटांनी राज्यातील शेतकरी हतबल झाला आहे. नाकर्ते सरकार आणि सदोदित अडचणीत टाकणारा निसर्ग यांच्या कात्रीत कोरोनानंतरच्या काळात शेतकरी अडकलेला होता. त्याला सावरण्यासाठी योग्य तो आधार देण्याचा प्रामाणिक प्रयत्न शिंदे-फडणवीस-पवार सरकारने चालविला आहेच. पण याही वेळी पावसाने शेतकऱ्याला नीटशी साथ दिलेली नाही. कधी तो गायबच झाला तर कधी नको इतका धो-धो कोसळला, त्यामुळे शेतकऱ्याचे ठिकठिकाणी मोठे नुकसान झाले आहे. कधी अस्मानी तर कधी सुलतानी असे एका पाठोपाठ येणारे संकट शेतकऱ्यांचा पिच्छा सोडायला तयार नाही. एकीकडे निसर्गाची अवकृपा तर दुसरीकडे दरघसरणीला तोंड द्यावे लागत असल्यामुळे शेतकरी निराश आणि हतबल झाला आहे. काही भागांमध्ये पाण्याचा प्रश्न आ वासून समोर उभा आहे. त्यामुळे रब्बीचा हंगाम कसा जाणार याविषयीही शेतकरी चिंतातूर आहे. त्यातच निवडणुका तोंडावर आल्यामुळे आंदोलनांमधून राज्यातील हवा आणखी बिघडवली गेली आहे. राजकीय हवा तापलेली असतानाच मुंबई-पुण्यात खरोखरीची हवाही कमालीची प्रदूषित झाल्याचे आढळून आले आहे. या साऱ्या प्रश्नांवर शक्य त्या मार्गाने तोडगा काढण्याचा प्रामाणिक प्रयत्न राज्यातील शिंदे-फडणवीस-पवार सरकारने चालविला आहे तर विरोधक मात्र वादंग माजविण्याच्या कामी जुंपलेले आहेत. दसरा-दिवाळीच्या सणासुदीच्या दिवसांत तरी हे कलुषित वातावरण मागे पडून जनतेच्या वाट्याला सणासुदीचा आनंद येवो हीच सदिच्छा.

# अश्विन शुक्ल दशमीला साजरा होणारा दसरा



अश्विन शुक्ल दशमीला साजरा होणारा दसरा हा हिंदूंचा प्रमुख सण आहे. दसरा हा सण असत्यावर सत्याचा विजय म्हणून साजरा केला जातो. या सणाला विजयादशमी असे देखील म्हणतात. हा सण शौर्याचा उपासक आहे. हा सण म्हणजे भारतीय संस्कृतीची शौर्याची पूजा आहे. व्यक्ती आणि समाजाच्या रक्तात शौर्य प्रकट व्हावे म्हणून दसऱ्याचा सण साजरा केला जातो.

विजयोत्सव- मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्री राम यांनी या दिवशी दशानन रावणाचा वध केला असे मानले जाते. त्या असत्यावर सत्याचा विजय म्हणून हा सण साजरा केला जातो. देशात दसरा किंवा विजयादशमी हा सण मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो.

दसरा ही तिथी वर्षातील सर्वांत शुभ साडेतीन मुहूर्तांपैकी असल्याचे मानले जाते. या दिवशी लोक मुहूर्त न बघता नवीन कामाला सुरुवात करतात. या दिवशी शस्त्र पूजन, वाहन पूजन केले जाते. प्राचीन काळी राजे या दिवशी विजयासाठी प्रार्थना करायचे आणि रण यात्रेला जात असे.

दसरा या शब्दाची उत्पत्ती- दसरा किंवा विजयादशमी हा शब्द 'दश' (दहा) आणि 'अहं' या शब्दापासून बनला आहे. दसरा सणाच्या उत्पत्तीबद्दल अनेक गृहितकं मांडली गेली आहेत. काही लोकांच्या मते हा शेतीचा सण आहे. दसऱ्याला सांस्कृतिक पैलूही आहे.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. जेव्हा शेतकरी आपल्या शेतात सोनेरी पीक उगवल्यानंतर अन्नधान्याची संपत्ती घरी आणतात, तेव्हा त्याच्या आनंदाचा साजरा करण्यासाठी आणि या प्रसंगी देवाचे आभार मानण्यासाठी पूजा केली जाते. तर काही लोकांच्या मतानुसार हे रण यात्रेचे द्योतक आहे, कारण दसऱ्याच्या वेळी पाऊस थांबतो, नद्यांना पूर येणे थांबते आणि वातावरणात बदल घडत असतात.

हा सण नवरात्रीशी देखील संबंधित आहे कारण हा सण नवरात्रीनंतर साजरा केला जातो आणि महिषासुराविरुद्ध देवीच्या धाडसी कृत्यांचाही त्यात उल्लेख करण्यात आला आहे. नवरात्रीच्या दहाव्या दिवशी दसरा किंवा विजया दशमी साजरी केली जाते. या दिवशी रामाने रावणाचा वध केला होता.

राम-रावण युद्ध- रावण राम यांची पत्नी माता सीतेचे अपहरण करून लंकेला गेला होता. भगवान राम हे युद्धाची देवी दुर्गा देवीचे भक्त होते, त्यांनी युद्धादरम्यान पहिले नऊ दिवस दुर्गा देवीची पूजा केली आणि दहाव्या दिवशी दुष्ट रावणाचा वध केला. त्यामुळे विजयादशमी हा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे. रामाच्या विजयाचे प्रतीक असलेल्या या सणाला 'विजयादशमी' म्हणतात.

मेळ्याचे आयोजन- दसरा सण साजरा करण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी मोठ्या जत्रेचे आयोजन केले जाते. लोक आपल्या कुटुंबासह, मित्रांसह येथे येतात आणि खुल्या आकाशाखाली जत्रेचा पूर्ण आनंद घेतात. जत्रेत बांगड्यांपासून खेळणी आणि कपड्यांपर्यंत विविध वस्तूंची विक्री होते. यासोबतच ही जत्रा चविष्ट पदार्थांनी भरलेली असते.

रामलीला आणि रावण वध- रामलीलाही यावेळी आयोजित केली जाते. रावणाचा मोठा पुतळा बनवून त्याचे दहन केले जाते. दसरा किंवा विजयादशमी हा भगवान रामाचा विजय म्हणून किंवा दुर्गापूजा म्हणून साजरा केला जातो, दोन्ही रूपात तो शक्ती-पूजा, शस्त्रपूजा, आनंद, आणि विजयाचा उत्सव आहे. रामलीलामध्ये ठिकठिकाणी रावण वध केला जातो.

शक्तीचा उत्सव- शारदेय नवरात्री, शक्तीच्या उपासनेचा उत्सव अनादी काळापासून प्रतिपदा ते नवमीपर्यंत नऊ तिथी, नऊ नक्षत्रे, नऊ शक्तींच्या नवधा भक्तीने साजरी केली जात आहे. या निमित्ताने नवरात्रीचे नऊ दिवस लोक जगदंबेच्या विविध रूपांची पूजा करतात आणि शक्तीशाली राहण्याची प्रार्थना करतात. भारतीय संस्कृती नेहमीच शौर्य आणि पराक्रमाची समर्थक राहिली आहे. दसरा हा सणही शक्तीचे प्रतीक म्हणून साजरा केला जाणारा सण आहे.

वाईटावर विजयाचा सण- या दिवशी क्षत्रियांच्या ठिकाणी शस्त्रांची पूजा केली जाते. या दिवशी रावण, त्याचा भाऊ कुंभकर्ण आणि मुलगा मेघनाद यांच्या पुतळ्यांचे दहन केले जाते. कलाकार राम, सीता आणि लक्ष्मणाचे रूप धारण करतात आणि फटाक्यांनी भरलेल्या अग्निबाणांनी या पुतळ्यांवर बाण चालवतात. पुतळ्याला आग लागताच धुराचे लोट जळू लागतात आणि त्यातील फटाके फुटू लागतात आणि त्यामुळे रावणाचा दहन होतो. हा सण वाईटावर चांगल्याचा विजय दर्शवतो.

सर्व वाईटाचा त्याग करून सदैव चांगुलपणाच्या मार्गावर चालले पाहिजे, अशी शिकवणही दसरा सण देतो. दसऱ्याचा सण आपल्याला वासना, क्रोध, लोभ, आसक्ती, मत्सर, अहंकार, आळस, हिंसा आणि चोरी या कारच्या पापांचा त्याग करण्याची प्रेरणा देतो.

**(साभार : मराठीवेबदुनिया)**

# तो दिवस दसऱ्याचा होता...

हिंदू संस्कृतीत खूप महत्व असलेला व मोठा सण दसरा हा आश्विन शुद्ध दशमीला येतो. आश्विन महिन्याच्या पहिल्या दिवसापासून नऊ दिवस नवरात्र असते. त्यांनंतरचा दहावा दिवस म्हणजेच 'दसरा', ह्याच सणाला विजयादशमी असेही म्हणतात. दसरा हा पराक्रमाचा, पौरुषाचा सण आहे. या सणात चातुर्वर्ण एकत्र आलेले दिसतात. या दिवशी सरस्वतीपूजन व शस्त्रपूजन केले जाते.

फार वर्षांपूर्वी वरतंतू नावाचे ऋषी होऊन गेले. त्यांच्याकडे विद्याभ्यासासाठी खूप विद्यार्थी येत. अभ्यास करून मोठे होत. त्या वेळी मानधन किंवा फी नव्हती. त्यामुळे शिक्षण संपल्यावर विद्यार्थी गुरुदक्षिणा देत. या ऋषींकडे 'कौत्स' नावाचा एक शिष्य होता. त्याचे शिक्षण पूर्ण झाल्यावर गुरूंनी त्याला घरी जाण्यास परवानगी दिली. त्याने ऋषींना विचारले कि, मी तुम्हाला गुरुदक्षिणा काय देऊ ? तुम्ही मागाल ते मी देईन. ऋषींनी कौत्साची परीक्षा घ्यावयाचे ठरविले. त्यांनी कौत्साला प्रत्येक विद्येबद्दल एक कोटी सुवर्णमुद्रा, याप्रमाणे १४ विद्यांबद्दल १४ कोटी सुवर्णमुद्रा आणावयास सांगितल्या.



कौत्स हे ऐकून गांगरून गेला. तो रघुराजाकडे गेला. परंतु राजाने त्याच वेळी विश्वजित यज्ञ केल्यामुळे खजिना संपला होता, तरीसुद्धा राजाने कौत्साकडे तीन दिवसांची मुदत मागितली आणि त्याने इंद्रावर स्वारी करण्याचे निश्चित केले. इंद्राला रघुराजाचा पराक्रम माहित होता. त्याने कुबेराला सारी हकीकत सांगितली. इंद्राने आपट्याच्या पानांची, सोन्याची नाणी बनवून, ती पावसासारखी राजाच्या राजवाड्यात पाडली. कौत्स त्या सुवर्णमुद्रा घेऊन, वरतंतू ऋषींकडे गेला व गुरुदक्षिणा घेण्यास विनंती केली. परंतु ऋषींनी त्यापैकी १४ कोटी सुवर्णमुद्रा परत घेण्यास राजाने नकार दिल्यामुळे कौत्साने त्या मुद्रा आपट्याच्या झाडाखाली ठेवून, लोकांना लुटायला सांगितल्या. लोकानीं त्या वृक्षाची पूजा केली व पाहिजे तेवढ्या मुद्रा लुटल्या. तो दिवस दसऱ्याचा होता. म्हणून त्या दिवसापासून त्या झाडाची पूजा करून सोन्याची पाने लुटण्याची प्रथा सुरू झाली.

साधुसंत येता घरा, तोचि दिवाळी-दसरा ! या तुकाराम महाराजांच्या उक्तीत दोन सणांचा अजोड असा उल्लेख केला आहे व तो योग्यच आहे.

**(साभार : मराठीमंडळी)**



## बदलते तंत्रज्ञान

# १० हजारांपेक्षा कमी किमतीत खरेदी करा आयफोन १२ मिनी



देशात ॲपल आयफोनचा चाहतावर्ग फार मोठा आहे, पण किंमत मोठी असल्याने आयफोन प्रत्येकजण खरेदी करु शकत नाही. त्यामुळेच आयफोनचे चाहते सतत ऑफरची वाट पाहत असतात, जेणेकरून त्यांना आयफोन स्वस्तात खरेदी करता येईल. आता अशाच लोकांसाठी आनंदाची बातमी आहे. आयफोन स्वस्तात खरेदी करण्याची मोठी संधी धावून आली आहे. हा आयफोन तुम्हाला १० हजार रुपयांपेक्षा कमी किमतीत खरेदी करता येणार आहे. चला तर पाहूया काय आहे ऑफर...

ॲपल आयफोन १२ मिनी खूप कमी किमतीत तुम्हाला खरेदी करता येऊ शकते. फोटोग्राफीसाठी या फोनमध्ये १२ मेगापिक्सलचे ड्युअल कॅमेरे देण्यात आले आहेत तसेच सेल्फीसाठी फोनमध्ये १२-मेगापिक्सलचा फ्रंट सेल्फी कॅमेराही आहे. ॲपल आयफोन १२ मिन ६९,९०० रुपयांच्या सुरुवातीच्या किमतीत लॉंच करण्यात आला होता आणि सध्या ४१,१५० रुपयांच्या सवलतीनंतर फ्लिपकार्टवर ९,८४९ रुपयांमध्ये उपलब्ध आहे.

ॲपल आयफोन १२ मिनची किंमत सध्या फ्लिपकार्टवर ८,९०१ रुपयांच्या सवलतीनंतर ५०,९९९ रुपये आहे. याव्यतिरिक्त खरेदीदारांना बँक ऑफ बडोदा क्रेडिट कार्ड ईएमआयवर २,००० रुपयांची सूट मिळू शकते. डिस्काउंटनंतर ॲपल आयफोन १२ मिनीची किंमत ४८,९९९ रुपये झाली आहे.

विशेष म्हणजे एक्सचेंज ऑफरचा फायदा ॲपल आयफोन १२ मिनीवरदेखील घेता येईल. तुमच्या जुन्या स्मार्टफोनच्या बदल्यात फ्लिपकार्ट तुम्हाला ३९,१५० रुपयांपर्यंत सूट देत आहे. तथापि, सवलत तुमच्या जुन्या स्मार्टफोनचे मॉडेल आणि स्थिती तसेच तुमच्या क्षेत्रातील एक्सचेंजची उपलब्धता यावर अवलंबून असते.

एक्सचेंज बोनसनंतर ॲपल आयफोन १२ मिनीची किंमत खाली आली आहे. याचा अर्थ असा की सर्व बँक ऑफर आणि सवलतींसह तुम्ही ४१,१५० रुपयांच्या सवलतीनंतर ॲपल आयफोन १२ मिनी फ्लिपकार्टवरून ९,८४९ रुपयांना खरेदी करू शकता.

# व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण



## निमित्त

जागतिक कीर्तीचे व्यंगचित्रकार नाव राशिपुरम कृष्णस्वामी लक्ष्मण यांची आज जयमती. त्यांच्या पूर्वजांचे वास्तव्य राशिपुरम किंवा रासीपुर (जि. सेलम) तालुक्यामध्ये होते. लक्ष्मण यांचा जन्म २४ ऑक्टोबर १९२१ रोजी म्हैसूर येथे झाला. म्हैसूरच्या महाराज कॉलेजमधून ते अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व तत्त्वज्ञान हे विषय घेऊन बीए झाले.


कर्नाटकातून मुंबईला आल्यावर लक्ष्मण यांनी प्रथम फ्री प्रेस जर्नल या दैनिकात व्यंग्यचित्रकार म्हणून नोकरी पत्करली. त्याआधीच ते बंगलोर येथून प्रसिद्ध होणाऱ्या कुरवंजी या कानडी नियतकालिकात व्यंग्यचित्रे काढीत होते. १९४९पासून ते टाइम्स ऑफ इंडियाचे प्रमुख व्यंग्यचित्रकार आहेत. आपल्या पहिल्या पानावरील राजकीय व्यंग्यचित्राखेरीज लक्ष्मण टाइम्सच्या त्याच पानावर दररोज एक छोटे व्यंग्यचित्र (पॉकेट कार्टून) काढीत असत. त्याचे शीर्षक आहे 'यू सेड इट'. टक्कल पडलेला, ब्रशासारख्या मिशा असलेला आणि जाड काचांच्या भिंगांचा चष्मा लावलेला, त्याचप्रमाणे धोतर व रेघारेघांचा चौकड्यांचा कोट असा पोशाख घातलेला एक सामान्य माणूस या छोट्या व्यंग्यचित्रांतून वावरत असे. त्याला 'लिट्ल मॅन' असे म्हणण्याची प्रथा आहे. या 'लिट्ल मॅन'च्या साक्षीने या व्यंग्यचित्रातल्या गोष्टी घडत. मंत्री, पुढारी आणि अन्य प्रकारचे लब्धप्रतिष्ठित यांच्या बिंगांचा स्फोट करणारी यातील बरीच व्यंग्यचित्रे असत. पुष्कळदा मुंबईकर नागरिकांचे नाना गोष्टींमुळे जे हाल चाललेले असतात, त्याचेही मर्मस्फोटक चित्रण या व्यंग्यचित्रांत दिसते.

लक्ष्मण यांची राजकीय व्यंग्यचित्रेसुद्धा बहारदार असत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींवर त्यांत बोचक टीका असे. पूर्वी जवाहरलाल नेहरूंचे ते बोलके व्यंग्यचित्र काढीत असत. तीच गोष्ट भूतपूर्व पंतप्रधान इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांची. व्यंग्यचित्रा (कार्टून) प्रमाणेच विडंबनचित्र (कॅरिकेचर) हाही लक्ष्मण यांचा हातखंडा. एरवी त्यांच्या राजकीय व्यंग्यचित्रात ताज्या घटनांवर औपरोधिक भाष्य असे.

भारतीय राजकारणातील गमतीजमती तर ते नेहमीच आपल्या पहिल्या पानावरील व्यंग्यचित्रांतून आजच्या राजकारणी मंडळींच्या दंभस्फोट करण्यासाठी उपयोगात आणत असत. इतक्या तल्लखपणे आजच्या सामाजिक व राजकीय जीवनातील विसंगती शोधून काढणारे फार थोडे व्यंग्यचित्रकार या देशात आहेत. लक्ष्मण हे स्वतःही उत्तम लेखक होते. लंडन येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय व्यंगचित्रप्रदर्शनात (१९५८) भाग घेणारे ते पहिले भारतीय व्यंग्यचित्रकार होत. त्यांना अनेक मानसन्मान लाभले. २६ जानेवारी २०१५ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

**(साभार : मराठी विश्वकोष)**


## क्लिक...क्लिक...!




**नागोठणे : नवरात्रीनिमित्त येथील ग्रामदेवता जोगेश्वरी माता मंदिरात विशेष धार्मिक उत्सवाचे आयोजन करण्यात येते. पंचक्रोशीत जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या या उत्सवात हजारो भाविक भक्तिभावाने सहभाग नोंदवत असतात.**

## आरोग्य प्रहर

# केसांची गळती होण्याची ही आहेत कारणे...



आजकाल केस गळण्याची समस्या सार्वत्रिक झालेली आहे. अगदी पौगंडावस्थेपासून ते ८० वर्षांपर्यंतचे रुग्ण केस गळतीसाठी डॉक्टरांकडे येतात. मानवाच्या डोक्यावर साधारणपणे ८० हजार ते एक लाख केस असतात. हे केस मूल जन्मतःच बरोबर घेऊन येते आणि हा आकडा नंतर वाढत नाही. आपले दररोज साधारणतः ५० ते ७० केस त्यांचे आयुष्य संपल्यामुळे गळून पडतात, परंतु त्यांची जागा नवीन केस घेत असतात. त्यामुळे आपल्या डोक्यावरचे केसांचे छप्पर पूर्ववत राहते.

टक्कल पडणे यालाच पॅटर्न हेअर लॉस असे म्हणतात कारण ही केस गळती एका विशिष्ट प्रकारे होत असते. हा प्रकार स्त्रियांमध्ये देखील आढळतो. परंतु त्याचा पॅटर्न वेगळा असतो. पन्नाशीपर्यंत पन्नास टक्के पुरुषांमध्ये, तर सत्तरी पर्यंत ४०% स्त्रियांमध्ये टक्कल पडण्याचा प्रादुर्भाव दिसून येतो. आता तुमच्या लक्षात येईल की, ८० वर्षांच्या आजींचे केस का कमी झाले. पूर्वी ही नैसर्गिक बाब म्हणून स्वीकारली जायची. आजचे आधुनिक स्त्री-पुरुष हे वास्तव स्वीकारताना दिसत नाहीत.

आज टक्कल पडणे हे पन्नाशीच्या आधी आणि तरुण वयात अधिकाधिक प्रमाणात दिसू लागले आहे. काय कारणे आहेत टक्कल पडण्याची? स्त्री आणि पुरुष दोघांच्याही बाबतीत अनुवंशिकता किंवा जीन्सच्या प्रभावामुळे टेस्टोस्टेरॉन या संप्रेरकाचा केसांच्या मुळावर परिणाम होऊन केस हळूहळू पातळ होऊ लागतात आणि कालांतराने समूळ नष्ट होतात.

ताण-तणाव, आहारातील बदल, बैठी जीवनशैली यामुळे तरुण मुलींमध्ये अनियमित पाळी, वाढलेले वजन, सतत येणारी मुरमे, गळणारे केस व चेहरा आणि इतर त्वचेवर येणारे जाड केस. ही आहेत पीसीओएसची लक्षणे. पुरुषांमध्ये देखील वाढलेले वजन, ताण-तणाव बैठी जीवनशैली आणि धूम्रपान यामुळे लवकर टक्कल पडण्याची शक्यता असते.

# मुरूडचा समुद्रकिनारा सुना...सुना..

## बीचवर पर्यटकांची वर्दळ झाली कमी



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड हे पर्यटनाचे क्षेत्र असून सुद्धा शनिवार रविवार असूनसुद्धा पर्यटक येथे न फिरकल्याने सर्वत्र शांततेचे वातावरण पहावयास मिळाले. काशीद आणि मुरूड बीचवर पर्यटकांची वर्दळ नसल्याचे पाहायला मिळत आहे. किमान काशीद बीचवर शनिवार-रविवार सुटीच्या दिवसांत पर्यटकांची मोठी वर्दळ असते. मुरूड बीचवरदेखील जंजिरा पाहणारे पर्यटक येत असतात, परंतु सध्या फारसे पर्यटक मुरुड व काशीद येथे फिरकलेले नाहीत. पर्यटक न आल्याने सर्व हॉटेल व लॉजिंग व्यवसाय करणारे रिकामे बसून होते. ना वर्दळ ना गर्दी त्यामुळे संपूर्ण व्यवसाय ठप्प झाले होते.

मुरूड शहारात समुद्र किनारी असणाऱ्या टपऱ्या ग्राहकाच्या प्रतीक्षेत होत्या परंतु ग्राहकच नसल्याने सर्वत्र नाराजीचे वातावरण दिसून येत होते. पर्यटनाच्या ऐन हंगामात प्रसिद्ध जंजिरा पर्यटकांसाठी खुला करण्यात आला असूनही मुरूड बीचवर पर्यटकांची उपस्थिती दिसून आली नाही. ऑगस्ट ते ऑक्टोबर महिन्यात मुरूड येथील पर्यटकांची संख्या कमालीची घटली आहे. या तीन महिन्यात तुरळकच पर्यटक आले आहेत. त्यामुळे येथील हॉटेल व लॉजिंग व्यवसाय अडचणीत सापडले आहेत. शनिवार रविवार पर्यटक फिरकत नसल्याने गर्दी ओसरली असून स्थानिकांचे व्यवसाय ठप्प झाले असून व्यवसायिक चिंतेत दिसून येत आहेत.

याबाबत गौरी लॉज चे मालक मनोहर बैले याना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, मागील तीन महिन्यात येथे पर्यटक मोठ्या प्रमाणात फिरकलेच नाहीत. अल्प पर्यटक आल्याने हॉटेल व लॉजिंग व्यवसायाचे मोठे नुकसान झाले आहे.

वीज बिल व अन्य कर हे भारावेच लागत आहेत. लवकरात लावर हि परस्थिती सुधारणे आवश्यक आहे अन्यथा हॉटेल व लॉजिंग व्यवसायिक मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागेल, अशी शक्यता त्यांनी वर्तवली आहे.

# मालमत्तेच्या लालसेतून सख्ख्या भावाने दोन बहिणींना पाजले विष

**अलिबाग : प्रतिनिधी**

मालमत्तेच्या लालसेतून भावानेच दोन सख्ख्या बहिणींना सुपमधून विष पाजून त्यांचा काटा काढला. रेवदंडा येथे हा धक्कादायक प्रकार घडला. आरोपी भाऊ गणेश शंकर मोहिते याला रायगड पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने अटक केली. त्याला २५ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी ठेवण्याचे आदेश दिले. सोनाली शंकर मोहिते (वय ३४ वर्ष) व स्नेहा शंकर मोहिते (वय ३० वर्ष) अशी मृत्यू पावलेल्या बहिणींची नावे आहेत.

रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सोमवारी (दि. २३) पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक बाळसाहेब खडे, अलिबाग उपविभागीय पोलीस अधिकारी भोर उपस्थित होते.

गणेश शंकर मोहिते हा त्याची आई जयमाला शंकर मोहिते व दोन बहिणी सोनाली शंकर मोहिते (वय ३४ वर्ष) व स्नेहा शंकर मोहिते (वय ३० वर्ष) यांच्यासोबत रहात होता. गणेशचे वडील शंकर मोहिते वनविभागात अधिकारी होते. २००९ साली त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या जागी



अनुकंपातत्वावर कुणाला नोकरीस लावावे यावरून गणेशचे आई व दोन बहिणींशी वाद होत असे. गणेशने वडीलांच्या खोट्या सह्या करून बँकेतून पैसे काढत असे. त्याने वडिलांचे घर आपल्या नावी करून घेतले होते. त्यामुळे आपल्या पतीच्या जागी आपल्या एका मुलीला तरी नोकरी मिळावी असे आईचे म्हणणे होते. गणेशला नोकरी मिळावी वाटत होते. काही वर्षांनी गणेशने आई व दोन बहिणींना काही आश्वासन देऊन त्यांच्याकडून नाहरकत घेतली. त्यामुळे गणेशला २०२१ साली वनखात्यात नोकरी लागली, परंतु गणेशला संपूर्ण मालमत्ता हडप करायची होती. त्यात आपल्या मार्गात अडसर ठरत असलेल्या दोन बहिणींचा काटा काढण्याचा कट त्याने रचला. १५ ऑक्टोबर रोजी त्याने आपल्या दोन बहिणी सोनाली आणि स्नेहा यांना सूपमधून उंदरांना मारण्याचे विष पाजले. सोनाली हिचा १६ ऑक्टोबर रोजी अलिबाग येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात मृत्यू झाला. २० ऑक्टोबर रोजी स्नेहाचा मृत्यू पनवेल येथील एम.जी.एम रुग्णालयात झाला.

**आरोपीला पोलीस कोठडी**

गणेशची आई जयमाला मोहिते यांनी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. मालमत्तेवरून शेजाऱ्यांशी वाद आहेत. त्यांनीच पाण्यातून मुलींना विष दिले असा संशय जयमाला मोहिते यांनी व्यक्त केला होता. गणेशदेखील आपल्या बहिणींच्या मृत्यूचे खापर शेजाऱ्यांवर फोडून त्यांना या प्रकरणात गुंतविण्याचा प्रयत्न करत होता, परंतु पोलीस तपासात संशयाची सुई गणेशच्या दिशेने वळली. गणेशनेच हे दुहेरी हत्याकांड केल्याचे निष्पन्न झाले. त्याच्या गाडीच्या डिकीत उंदीर मारण्याचे विष सापडले. त्याने मोबाईलवर ५३वेळा वेगवेगळ्या विषाची माहिती सर्च केल्याचे आढळून आले.

# पोलादपूर येथे जे. एस. एस. रायगडची कौशल्य स्पर्धा

**पोलादपूर : रामप्रहर वृत्त**

पोलादपूर येथे कौशल्य स्पर्धा हा कार्यक्रम जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या माध्यमातून सोमवारी (दि. २३) साजरा करण्यात आला तसेच कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांना कल्पना म्हात्रे यांनी स्वच्छतेची शपथ दिली.

जन सामान्यांमध्ये प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून विविध सरकारी योजना, स्वच्छता जनजागृती माहिती, आरोग्य विषयक जन जागृती, कौशल्य विकास उपक्रम आदिंना प्रोत्साहन देण्याच्या उददेशाने संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष गीतांजली ओक, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्याभरात जे. एस. एस. रायगड च्या माध्यमातून विविध कौशल्य उपक्रम राबिवले जात असतांना 'कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार' यांच्या विशेष पुढाकारातून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षणाचे कार्य मागील २० वर्षांपासून सक्रियपणे सुरू आहे.

स्वच्छता जनजागृती या कार्यक्रमाप्रसंगी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे, प्रशिक्षिका मीनल महाडिक व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत कौशल्य स्पर्धा हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.




## नमुना एन. डी.

**(नियम ९२ (३) पहा)**

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH 06/17/KHL/2001 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH 46 BB 9384 चे मालक संतोष धर्मा शिंदे यांचे दि. २१/०२/२०२३ रोजी निधन झालेले आहे.

मी, निशा संतोष शिंदे, पत्ताः निगडोली, माजगाँव, ता. खालापूर जि. रायगड- ४१०२२० उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/ प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/ प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल/ प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेल महानगरच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव :** निशा संतोष शिंदे,
पत्ता : निगडोली, माजगाँव,ता. खालापूर जि. रायगड ४१०२२०




**खोपोली : भाजपच्या महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांनी खोपोली व परिसरातील नवरात्र उत्सव मंडळांना भेटी देऊन देवीचे दर्शन घेतले, त्याचप्रमाणे सामाजिक व विकास कामाबद्दल कार्यकर्त्यांशी चर्चा केली.**
(छाया : जयवंत माडपे)


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e- TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-41/23-24 7000028735 | Replacement of existing old disc insulator by new long rod AF porcelain insulators of 220kV Apta - Uran 1,2,3 & 4 D/C line under EHV (O&M) Division Panvel | Rs. 59,41,582/- |

EMD 1% of estimated cost, Submission of bids from **23.10.2023 to 30.10.2023 at 11:00 hrs**, Opening date: **30.10.2023 at 11:30 Hrs**. Tender Fee- Rs. **500/-+ GST** each tender. For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer(Adm) Tel No. **022-27459624,** Mob. No. **9769006131**. E-mail ID **se7200@mahatransco.in**

**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**


# कर्जतमध्ये मुलींसाठी लाठीकाठी प्रशिक्षण

**कर्जत : प्रतिनिधी**

विश्व हिंदू परिषेदेचे मातृशक्ति विभाग व दुर्गावाहिनीतर्फे कर्जत प्रखंडातील मुलींसाठी नवरात्रोंच्या निमित्ताने मुलींमधे भक्ति, शक्ति, सांस्कृतिक वृत्ती निर्माण व्हावी. या उद्देशाने लाठीकाठी, छुरिका, प्रशिक्षण व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

कर्जत येथील अभिनव ज्ञान मंदिर शाळेच्या मैदानावर आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात त्रिवार ओंकार, एकात्मता मंत्र व दीपप्रज्वलित करून झाली. या वेळी व्यासपीठावर व्याख्याते, साहित्यिक उमेश चव्हाण, लाठिकाठी प्रशिक्षक हरिचंद्र पाटील मुंबई, मातृशक्ति विभाग दया हजारे उपस्थित होते. उमेश चव्हाण यांनी आपल्या व्याख्यानातून नवरात्रीचे, नवरंगाचे, भारतातील शक्ति पिठांचे आध्यात्मिक, वैज्ञानिक महत्व पटवून दिले, हरिचंद्र पाटील यांनी लाठिकाठी प्रशिक्षणातील तंत्र शिकविले त्यामधे शरीरावरील शत्रुकडून होणारे आघात कसे रोखायचे व आघात कसे करायचे याचे प्रशिक्षण दिले.

या वर्गास विश्व हिंदू परिषद केंद्रीय सहमंत्री महेंद्र तथा दादा वेदक, बजरंग दल कुलाबा जिल्हा संयोजक साईंनाथ श्रीखंडे, विश्व हिंदू परिषद पनवेलचे पदाधिकारी सुनील उतेकर, सचिन झुंजारराव यांनी भेट दिली. वर्ग यशस्वी करण्या साठी विहिप कर्जत प्रखंड मंत्री विशाल जोशी, मठमन्दिर प्रमुख सचिन ठाकुर, मातृशक्ति, दुर्गावाहिनी यांनी विशेष सहकार्य केले. प्रशिक्षण वर्गास ४७ मूली (दुर्गा) व ६ मातृशक्तिनी (महिला) यांनी सहभाग घेतला. पाहुणयांचे स्वागत दया हजारे यांनी केले, परिचय व सुत्र संचालन प्रा.स्वप्नाली पाटील यांनी केले. शांती मंत्र व घोष घेऊन प्रशिक्षणाचा वर्गाचा समारोप झाला.



# झेंडूच्या दरात घसरण

**अलिबाग : प्रतिनिधी**

नवरात्रौत्सवाच्या निमित्ताने झेंडूच्या फुलांना मागणी वाढली आहे. रायगड जिल्ह्यात झेंडूची मोठी आवक झाली आहे. मात्र झेंडूचा दर घसला आहे. अलिबागमध्ये बाजारात ७० ते ९० रूपये किलो दराने झेंडूची विक्री होत आहे.

मंगळवारी (दि. २४ ) दसरा आहे. त्यामुळे अलिबागच्या मुख्य बाजारपेठेत झेंडूची फुले फुलांच्या खरेदीसाठी नागरीकांनी गर्दी केली होती. यंदा झेंडूचे उत्पादन मोठया प्रमाणावर झाले आहे, मात्र मागणीच्या तुलनेत आवक वाढल्याने अपेक्षित दर मिळत नाही. दरवर्षी नवरात्र उत्सवाच्या काळात झेंडूचा दर १०० ते १२५ रुपये प्रतिकिलो पर्यंत पोहचतो. दसऱ्याला हा दर १५० रूपये प्रतिकिलोचा टप्पा गाठतो. त्यामुळे आवश्यक तेवढीच खरेदी होत असे, मात्र यंदा दरात घसरण झाल्याने भाविकांकडून मोठया प्रमाणावर खरेदी केली जात आहे. झेंडूच्या फुलांच्या माळा ५० रूपये दराने विकल्या जात आहेत.

**रोहे : सुनील तटकरे युवा प्रतिष्ठानच्या वतीने रोह्यातील नदी संवर्धन येथे नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या नवरात्रोत्सवात संगीताच्या तालावर तरुणाई थिरकत असताना रविवारी महीला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, त्यांच्या पत्नी वेदांती तटकरे ठेका धरताना दिसले.**




# पनवेल महानगरपालिका

**बांधकाम विभाग**

**ई-निविदा सूचना**

**निविदा सूचना क्र.पमपा/बांधकाम/२१२३/प्र.क्र. ०८/३८५६/२०२३** **दिनांक:२३/१०/२०२३**

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Central Government / State Government / Government under taking) विभागात पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/१८८/ २०२३-२४ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती- अ, खारघर येथील बेलपाडा अंडरपास ते NIFT महाविद्यालयापर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण व अनुषंगीक कामे करणे. | ९,००,३६,१८७/- |
| २. | PMC/CE/१८९/ २०२३-२४ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - अ, खारघर येथील बेलपाडा मेट्रो स्टेशन ते गणेश मंदिर सेक्टर-५ ते उत्सव चौक रस्त्याचे White Toping पध्दतीने काँक्रीटीकरण करणे, व पादचारी मार्गाचे उन्नतीकरण व अनुषंगीक कामे करणे. | १३,८१,४५,९०९/- |
| ३. | PMC / CE /१९०/ २०२३-२४ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - अ, खारघर मधील लिटील वर्ल्ड मॉल सेक्टर - २ ते उत्सव चौक रस्ता काँक्रिटीकरण करणे व इतर रस्ते डांबरीकरण करून उन्नतीकरण व अनुषंगीक कामे करणे. | ८४,४०,५४,९०८/- |
| ४. | PMC/CE/१९१/ २०२३-२४ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती - ब मधील सायन पनवेल महामार्ग सेक्टर-१ ते तळोजा लिंक रोड सेक्टर- १० ई कळंबोली येथील मुख्य रस्ता काँक्रीटीकरण व अनुषंगीक कामे करणे. | ६५,०२,४३,५०१/- |
| ५. | PMC/CE/१९२/ २०२३-२४ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती - ब मधील सायन पनवेल महामार्ग ते के. एल. ई कॉलेज सेक्टर-१ ते सेक्टर- १२ तलाव, कळंबोली पर्यंत रस्त्याचे उन्नतीकरण व अनुषंगीक कामे करणे. | १५,८८,३२,३२१/- |
| ६. | PMC/CE/१९३/ २०२३-२४ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती - क, NH४ ते NH४B पनवेल महानगरपालिका मुख्यालय (सेक्टर १६, नविन पनवेल (पश्चिम)) रस्ता उन्नतीकरण, काँक्रिटीकरण व अनुषंगीक कामे करणे. | ३६,७७,०२,५१८/- |
| ७. | PMC/CE/१९४/ २०२३-२४ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती- क येथील स्वामी नारायण मार्ग (न्यायाधीश निवास (ठाणा नाका रोड) ते मित्रानंद सोसायटी) पर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण व अनुषंगीक कामे करणे. | ६,९२,५६,६२३/- |
| ८. | PMC/CE/ १९५/ २०२३-२४ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - ड मधील नविन पनवेल, सेक्टर- १ एस येथील एच.डी.एफ.सी. बँक समोरील चौक व सेक्टर- ११ येथील क्रिकेट अँकेडमी समोरील चौक कॉक्रीटीकरण करणे. | ५,२७,५५,८३९/- |

या कामाच्या ई-निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. २७/१०/२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(डॉ.प्रशांत रसाळ)**
**अतिरिक्त आयुक्त (I)**
**पनवेल महानगरपालिका**

# ‘सीकेटी’च्या विद्यार्थ्यांची क्रीडा प्रकारात कामगिरी

## विभागीय वुशू स्पर्धेत सोहेल सय्यद प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक संचालनालय पुणे महाराष्ट्र राज्य आणि जिल्हा क्रीडा कार्यालय मुंबई उपनगर आयोजित मुंबई विभागीय शालेय वु शु स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील सोहेल सय्यद याने प्रथम क्रमांक प्राप्त केला त्याची अमरावती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय वुशु स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



सोहेलने मिळविलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, सभागृह नेते परेश ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत , सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी सोहेलचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## क्षितीज आगलावेची तलवारबाजी स्पर्धेमध्ये राज्यस्तरीय निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



क्रीडा व युवक संचालनालय पुणे महाराष्ट्र राज्य आणि रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय आयोजित (२२ ऑक्टोबर) रामशेठ ठाकूर विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय खारघर येथे झालेल्या विभागीय तलवारबाजी स्पर्धेमध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील क्षितीज प्रमोद आगलावे याने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

क्षितीजची राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्याचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# नैना गृहनिर्माण योजनेच्या ऑनलाईन अर्जास मुदतवाढ

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडकोच्या नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित अर्थात नैना क्षेत्रातील सर्वसमावेश गृहनिर्माण योजनेस (Inclusive Housing) नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्याने, अधिकाधिक नागरिकांना या योजनेचा लाभ घेता यावा याकरिता योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीस २७ ऑक्टोबर २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. योजनेकरिता संगणकीय सोडत २२ नोव्हेंबर २०२३ रोजी होणार आहे.

नैना प्रकल्पाच्या मंजूर डीसीपीआरनुसार ४००० चौ. मी. किंवा अधिक क्षेत्रफळ असलेल्या भूखंडांमध्ये सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटातील घरे विकसित करण्याची तरतूद आहे. त्या अनुषंगाने भूखंडाच्या एकूण क्षेत्रफळापैकी २० टक्के जागा ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटाच्या सदनिकांसाठी खाजगी विकासकांमार्फत नैना प्रकल्प परिसरामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यानुसार १९ सप्टेंबर २०२३ रोजी एकूण १८१ सदनिकांची गृहनिर्माण योजना सादर करण्यात आली होती. यामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १७ तर अल्प उत्पन्न गटासाठी १६४ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

सदनिकांकरिता पात्र उमेदवारांची सोडत पद्धतीने निवड करून पात्र उमेदवारांची यादी विकासकाला पाठविणे, एवढ्यापुरतीच सिडकोची भूमिका मर्यादित आहे. ऑनलाइन अर्ज नोंदणी व अन्य प्रक्रियांकरिता https://lottery.cidcoindia.com हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

ऑनलाइन अर्ज नोंदणीच्या अनुषंगाने अर्ज सादर करणे, शुल्क भरणा, प्रारुप यादी प्रसिद्ध करणे व संगणकीय सोडत या प्रक्रियांनाही मुदतवाढ मिळाली आहे. याबाबतचे सुधारित वेळापत्रक उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे.



खारघर : रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये नवरात्रोत्सवानिमित्त गरब्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी गरबा खेळण्याचा मनसोक्त आनंद घेतला.

## सीबीडी बुद्ध विहारात आज धम्मचक्र प्रवर्तनाचे दिन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सीबीडी येथील सम्राट अशोक महाविहार संस्थेच्या वतीने संविधान भवन, सम्राट अशोक महाविहार परिसर, रमाबाई आंबेडकर नगर, सेक्टर – ८, सीबीडी–बेलापूर नवी मुंबई येथे मंगळवारी (दि. २४) सायंकाळी ६ वाजता ६८ व्या अशोक विजया दशमी धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे आयोजन डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे.

२१व्या शतकातील बौध्द धर्मीय आणि भारत यावर मुंबई उच्च न्यायालयाचे वकिल अ‍ॅड. अनिलकुमार बागुल यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. प्रारंभी सकाळी ८.३० वाजता धम्म ध्वजारोहन पुज्य भंन्ते प्रज्ञा आर्यशाक्य, भंन्ते अश्वमेघ यांच्या हस्ते आहे. पचशिल महिला मंडळाच्या वतीने खीरदान आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे या व्याख्यानाला युवक आणि महिलांनी मोठया संख्येन उपस्थित रहावे, अशी विनंती आशा शिंदे, जे.डी. कसबे, नारायण वाघमारे, दिपक कांबळे, शितल मोहिते, सुधाकर सोनकांबळे, राजरत्न डोंगरगावकर, सचिन आव्हाड, सुनिल रसनबहिरे यांनी केली आहे.

# हवामान कृती दिनानिमित्त पनवेल महापालिकेतर्फे जनजागृती कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत पनवेल महानगरपालिकेच्यावतीने लोकनेते रामशेठ ठाकूर



शाळेमध्ये आंतरराष्ट्रीय हवामान कृती दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम नुकताच घेण्यात आला.

२४ नोव्हेंबर हा आंतरराष्ट्रीय हवामान कृती दिन म्हणून साजरा केला जातो. उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या सूचनेनूसार दिवसेंदिवस बदलत्या हवामानामुळे पर्यावरणावरती होणाऱ्या दुष्परिणामा बद्दल विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती होण्याच्यादृष्टीने महानगरपालिकेच्या वतीने माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

या वेळी प्लास्टिक उपवास ह्या अनोख्या विषयावर विद्यार्थ्यासोबत चर्चा करण्यात आली. तसेच वृक्षारोपणाचे महत्त्व, पर्यावरणपूरक उत्सव, ऊर्जे ची बचत, हवामान बदलाची माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचवणे याबरोबरच प्लास्टिक किती हानिकारक आहे ह्याचीदेखील माहिती विद्यार्थ्यांना तेथे देण्यात आली. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर शाळेचे मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे व सहशिक्षक तेथे उपस्थित होते.

नवीन पनवेल येथील सेंट जोसेफ शाळेमध्येदेखील आंतरराष्ट्रीय हवामान कृती दिनाबद्दल जनजगृती कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी मुख्याध्यापिका फरझाना तुंगेकर आणि सुपरवायझर निलूफ उपस्थित होत्या.



नवीन पनवेल : येथे डॉ. मीनल लाड–शिंदे यांच्या मीनल्स होमिओपॅथिक अ‍ॅण्ड अ‍ॅस्थेटिक क्लिनिकचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी अ‍ॅड. आशा भगत, गणेश शिंदे, परेश पाटील, रामकृष्ण लाड, दगडू शिंदे, वसुंधरा शिंदे, दत्तात्रय लाड, जयश्री लाड, नानासाहेब शिंदे, मंगल शिंदे, दिलीप महाडिक, विजया लाड, रोहित आदी उपस्थित होते.

**पनवेल : भाजप महिला मोर्चा उलवे नोड अध्यक्ष योगिता सुहास भगत यांनी उलवे येथील आम्ही उलवेकर मित्र मंडळ, यमुना सामाजिक शैक्षणिक संस्था, उलवे सामाजिक संस्था, बेंगोली वेल्फेअर असोसिएशन, शेलघर येथील नवरात्रोत्सव मंडळ, खारकोपर येथील सोमनाथ घरत नवरात्रोत्सव मंडळ, मोरावे येथील वितेश दादा युवा मंच येथील देवींचे दर्शन घेतले. या वेळी उपाध्यक्षा सुजाता पाटील, बानूताई भगत, पुष्पा भगत, अर्चना मिश्रा, मंजुला कोळी, कपिला जी, निकिता खारकर (उलवे नोड १ – अध्यक्ष), सुहास भगत, जीवन भगत, सागर ठाकूर, विनय घरत, पंकज म्हात्रे, संकेत घरत आदी उपस्थित होते.**







## रामशेठ ठाकूर महाविद्यालयातर्फे वित्तीय साक्षरतेवर मार्गदर्शन सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील व्यवस्थापन संघटनेतर्फे ओवेपेठ गावातील रामशेठ ठाकूर न्यू इंग्लिश स्कूलमध्ये वित्तीय साक्षरता या विषयावर इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यी व विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले होते.

या सत्रासाठी महाविद्यालयातील व्यवसाय व्यवस्थापन शिक्षण विभागातील सर्व प्राध्यापकांनी रामशेठ ठाकूर न्यू इंग्लिश स्कूल ओवेपेठ गावात उपस्थित राहून इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना वित्तीय संकल्पना, तसेच व्यवहारिक जीवनामध्ये वित्तीय व्यवहार कसे करायचे, त्याचे प्रकार, कर्ज, भांडवल, नेट बँकिंगच्या माध्यमातून व्यवहार कसे करायचे व त्याचे उपयोजन दैनंदिन जीवनामध्ये कसे करायचे याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. रामशेठ ठाकूर न्यू इंग्लिश स्कूल येथील इयत्ता नववी व दहावीच्या सुमारे ९० विद्यार्थी व विद्यार्थिनींनी या वित्तीय साक्षरता सत्राचा लाभ घेतला.

प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी व्यवस्थापन संघटनेचे समन्वयक व सर्व सदस्यांचे हा उपक्रम यशस्वीरित्या घेतल्याबद्दल अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. रीत ठुले यांनी केले व प्रा. अंकिता जांगिड, प्रा. दिव्या निंबोत्री, प्रा. विशाल देशमुख प्रा. आरती कागवडे प्रा. रेवन शिंदे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



पनवेल : प्रसिध्द लोकगीत गायक जगदीश पाटील यांनी जय बजरंग कला, क्रिडा व सांस्कृतिक मंडळ, कोपर व भाजप उलवे नोड २ आणि भाजप महिला मोर्चा २च्या आयोजित नवरात्रोत्सवाला भेट देऊन देवीचे दर्शन घेतले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसपंच विजय घरत यांनी त्यांचे स्वागत केले.



एमसीसीएच सोसायटी, पनवेल



माँ वैष्णव दरबार मंदिर, चाणजे, करंजा रोड, उरण





पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शेलघर येथील सार्वजनिक नवरात्रोत्सवाला भेट देऊन देवीचे दर्शन घेतले. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, रतनशेठ भगत, अजय भगत, अमृत भगत, श्रेयांश भगत आदी उपस्थित होते.

## ‘इनरव्हील’तर्फे महिला पोलिसांचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवरात्रोत्सवामध्ये पोलीस बांधव आपले कर्तव्य निभावत असतात. यामध्ये महिला पोलीसही कुठेच कमी नसतात. या महिलांचा सन्मान करून त्यांचे कौतुक करण्याचा उपक्रम इनरव्हील क्लब पनवेल इन्डस्ट्रीयल टाऊनच्या वतीने राबविण्यात आला. या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गलांडे यांचा व त्यांच्या सहकारी महिला पोलिसांचा सन्मान करण्यात आला.

यामध्ये रसिका म्हात्रे, राजश्री नेहे, कासार, पूनम तांडेल, भाग्यश्री जोंधळे, वैशाली गावित या महिलांचा सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत लांडगे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सई पालवनकर, डॉ. राजश्री बागडे, माधुरी कांडपिळे आदी उपस्थित होते.



## निवडक

### रोह्यात नवरात्रोत्सवाचा उत्साह



**रोहे** : खासदार सुनील तटकरे यांनी शहरातील नवरात्रोत्सव मंडळाने स्थापना केलेल्या मातेचे दर्शन घेतले. शनिवारी ग्रामदैवत श्री धावीर महाराजांचे दर्शन घेतल्यानंतर रुखी समाज, अंबिका धाम मंदिर, गुजराती समाज, उत्तर भारतीय समाज, गिरोबा मंदिर अंधार अळी, साईबाबा मंदिर धनगर आळी, त्रिमूर्ती नगर, जैन समाज, अष्टमीसह अन्य नवरात्र उत्सवाला भेटी दिल्या. या वेळी त्यांच्या समवेत राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, माजी गटनेते महेंद्र गुजर, महेश कोल्हटकर, सुभाष राजे, चंद्रकांत पार्टे, भूपेंद्र धाटावकर आदी उपस्थित होते.

### माणगावमध्ये मार्गदर्शनपर मेळावा

**माणगाव** : तालुका पाटबंधारे खाते सेवानिवृत्त कर्मचारी संघाच्या नवव्या वर्धापन दिनानिमित्त मार्गदर्शनपर मेळावा शनिवारी (दि. २८) अध्यक्ष नथुराम पाष्टे यांच्या अध्यक्षतेखाली कुणबी भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्यात जिल्हा कोषागार अधिकारी देवीदास टोंगे, कार्यकारी अभियंता रा. पा. वि. कोलाड मिलिंद पवार, प्रभारी उपकोषागार अधिकारी मंगेश हटकर, उपविभागीय अधिकारी पाटबंधारे उपविभाग श्रीकांत महामुनी हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत, तसेच या मेळाव्यात ७५ वर्ष वय झालेल्या सभासदांचा सत्कार समारंभही आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास संघाच्या सर्व सभासदांनी सहकुटुंब उपस्थित राहावे असे आवाहन संघातर्फे करण्यात आले आहे.

### बेकायदा दारू बाळगल्याप्रकरणी गुन्हा

**माणगाव** : गावठी दारू बेकायदा बाळगल्याप्रकरणी आरोपीवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतची फिर्याद पोलीस कॉन्स्टेबल युवराज अंतराम दहिफळे यांनी दिली. आरोपी मोतीराम दौलत कोळी (वय ५०, रा. विळे आदिवासीवाडी) याच्याकडे विनापरवाना गावठी दारू तयार करण्याचे साहित्य व गावठी दारू अंदाजे १० हजार ३७० रुपयांचा माल आढळला. याप्रकरणी आरोपीवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार जाधव हे करीत आहेत.

# कर्जतमध्ये ७८ ठिकाणी भाताची आणेवारी

## भातपीक कापणी आणि मळणी सुरू



**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील सर्व गावातील भाताची आणेवारी ठरविण्यासाठी भाताचे शेतात शासकीय अधिकारी पोहचले आहेत. तालुक्यातील ७८ ठिकाणी भाताची आणेवारी ठरविण्यासाठी मोहीम सुरू आहे. महसूल, कृषी आणि पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी संबंधित भाताच्या प्लॉटवर पोहचले आहेत.

मोठ्या भाताचे पीक घेतले जात असलेल्या कर्जत तालुक्यातील भाताची आणेवारी निश्चित करण्यासाठी शासकीय अधिकारी भाताच्या शेतात पोहचले आहेत. भाताची शेती करणारे शेतकरी यांची गुंठेवारी आणेवारी निश्चित करण्यासाठी दरवर्षी शेतीचे एका गुंठ्याचे क्षेत्रात भाताच्या शेताची कापणी, मळणी आणि पिकलेल्या भाताचे वजन यांची मोजमापे घेतली जातात. रायगड जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने तालुक्यात महसूल विभाग, जिल्हा परिषद आणि कृषी विभागांकडून भाताची आणेवारी निश्चित करण्यासाठी मोहीम सुरू आहे. आणेवारी निश्चित करण्यासाठी ७८ भूखंड निश्चित करण्यात आले असून त्यातील भाताचे २२ भूखंड हे महसूल विम्याचे कर्मचारी शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन भाताची कापणी, मळणी आणि वजन घेण्याचे काम करणार आहेत तर २२ प्लॉट हे कर्जत पंचायत समितीचे कर्मचारी आणि १६ प्लॉटची मोजदाद कृषी विभागाचे कर्मचारी करीत आहेत.

तालुक्याची भाताची आणेवारी निश्चित करण्यासाठी तालुक्यात ३० गावांमध्ये ७८ ठिकाणी प्रत्येकी एक गुंठा क्षेत्रातील भाताची पीक आणेवारी निश्चित करण्यासाठी निवडण्यात आले आहेत. जुलै महिन्यात हे ७८ प्लॉट निवडण्यात आले असून १०फूट बाय १०फूट क्षेत्रामध्ये निवडण्यात आले होते. त्या ठिकाणी लागवड केलेले भाताचे पीक यांची कापणी आणि मळणी ही महसूल, कृषी, पंचायत समिती यांचे अधिकारी कर्मचारी यांच्या उपस्थितीत केली जाईल. त्यानंतर अधिकारी वर्ग सर्व भाताची मोजदाद करून अहवाल वरिष्ठ कार्यालयाला देतात.

तालुक्याचा अहवाल या वर्षाच्या अखेरीस रायगड जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात दिला जाणार आहे. त्यानंतर जानेवारीमध्ये कर्जत तालुक्याची भाताची आणेवारी निश्चित होणार आहे. त्यामुळे या आणेवारी दर निश्चित करण्याच्या कार्यक्रमाला महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे.

# मीठेखार ग्रामपंचायतीवर भाजपचे अशोक वाघमारे बिनविरोध

## मुरूडमधील सर्वच ग्रामपंचायतीत यश मिळणार-ॲड. महेश मोहिते



**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यामधील मीठेखार ग्रामपंचायतीमध्ये थेट सरपंच म्हणून भाजपचे आदिवासी मोर्चाचे अध्यक्ष अशोक जानू वाघमारे यांची बिनविरोध निवड जाहीर झाली आहे. सोमवारी छाननीमध्ये एकच अर्ज दाखल झाल्याचे जाहीर होताच त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. तालुक्यातील पहिल्याच ग्रामपंचायतीमध्ये भाजपने थेट सरपंच मिळवले आहे.

या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते यांनी, मुरूड तालुक्यात ग्रामपंचायत निवडणुकीत भरगोस यश प्राप्त होणार आहे. १२ ग्रामपंचायतींमध्ये भाजप निवडणूक लढवत असून येथे निकराची लढत देऊन यश संपादित करणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. मीठेखार ग्रामपंचायतीमध्ये थेट सरपंच म्हणून भाजपचे कार्यकर्ते अशोक वाघमारे हे बिनविरोध निवडून आल्याने पक्षाला हा शुभशकुन आहे. ५ नोव्हेंबर रोजी ग्रामपंचायत निवडणुकीचे मतदान असून भाजपला या निवडणुकीत घवघवीत यश मिळणार आहे. ग्रामपंचायत निवडणुकीत नातीगोती व उमेदवाराचे असणारे संबंध यावर विजय निश्चित होत असतो. या वेळी भाजपचे सक्षम उमेदवार असून विजय निश्चित होणार आहे. शिवसेनेशी बोलणी सुरू असून काही ठिकाणी सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती या वेळी त्यांनी दिली.

मागील ग्रामपंचायत निवडणुकीत स्वबळावर भाजपने निवडणूक लढवल्या होत्या. त्यावेळी ३२ ग्रामपंचायत सदस्य व दोन सरपंच निवडून आले होते. यंदा हा आकडा वाढणार असून जास्तीत जास्त सरपंच व सदस्य निवडून येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

## शिवीगाळी व मारहाण प्रकरणी आरोपीवर गुन्हा

**माणगाव : प्रतिनिधी**

शिवीगाळी व मारहाणप्रकरणी आरोपीवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा शुक्रवारी (दि. २०) तालुक्यातील पाटणूस आदिवासीवाडी येथे घडला. याबाबतची फिर्याद नथुराम जयराम वाघमारे (वय ४५, रा. पाटणूस आदिवासीवाडी) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

माणगाव पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी नथुराम जयराम वाघमारे यांनी आरोपी विठ्ठल गणेश वाघमारे (रा. पाटणूस आदिवासीवाडी) यांच्याकडून त्यांची वडिलोपार्जित आदोली (धान्य मोजण्याचा लोखंडी भांडा) आरोपीस सांगून त्यांच्या घरी घेऊन गेला व परत दिला नाही. या गोष्टीचा मनात राग धरून आरोपीने फिर्यादीस शिवीगाळी करून फिर्यादीच्या घरात जाऊन लाकडी दांडक्याने फिर्यादीच्या डोक्यात मारून दुखापत केली, तसेच फिर्यादीचा सहकारी व फिर्यादींना मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी आरोपीवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक लहांगे हे करीत आहेत.

# साईनगरच्या शारदोत्सवात विविध स्पर्धा उत्साहात



**मुरूड : प्रतिनिधी**


विद्यानगर पश्चिम, चेंढरे येथे विविध उपक्रमांचे आयोजन करुन, नवरात्रोत्सवाचे सांस्कृतिक, धार्मिक पावित्र्य जपले गेले आहे. बदलत्या जीवनशैलीत कालानुरूप डीजे, स्पिकरचा मोठा आवाज, विचित्र गाणी या सर्वांना बगल देऊन साईनगर मित्रमंडळ येथील विद्यार्थी आणि सर्व नागरिकांसाठी विविध प्रकारच्या स्पर्धांचे दरवर्षी आयोजन करते.

या वेळी प्लेग्रुपपासून खुल्या गटापर्यंत महिला आणि पुरुषांसाठी फॅन्सीड्रेस, चित्रकला, स्लो सायकलिंग, संगीत खुर्ची, हस्ताक्षर, चमचालिंबू अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले. या सर्व स्पर्धांना स्थानिक नागरिक आणि विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. यात साधारण तीनशेहून अधिक स्पर्धकांनी भाग घेतला. यातील विजयी स्पर्धकांना मंडळाकडून वस्तूरुपाने आकर्षक बक्षिसे किंवा रोख स्वरूपातील बक्षिसे देण्यात येतात.

ही बक्षिसे म्हणजे होतकरू विद्यार्थ्यांसाठी पाठीवर दिलेली प्रेरणादायी थाप ठरत असल्याचे अनेकांनी बोलून दाखवले. मनोरंजनासह सर्व प्रकारचा सलोखा वृद्धिंगत करण्यासाठी विद्यार्थी, आजारी व्यक्ती, वृद्ध या सर्वांचा प्राधान्याने विचार करणे ही मंडळाची मुख्य भूमिका असल्याचे येथील मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

नेमून दिलेली ध्वनीक्षमता आणि वेळेनुसार गरबानृत्यात येथील रहिवाशी रममाण झाले आणि सामाजिक एकोपा आणि स्नेहाचे दर्शन घडले. फॅन्सी ड्रेस स्पर्धेच्या परीक्षक म्हणून भावेश्री वाळंज, मानसी कवळे, सारिका वाटवे यांनी काम पाहिले.

## रोहा बाजारपेठेत झेंडुची फुले दाखल



**रोहे : प्रतिनिधी**

रोह्यात आता दसरा सणानिमित्ताने नागरीकांची लगबग सुरू झाली आहे. मंगळवारी (दि. २४) दसरा हा सण असून या सणासाठी नागरिक हार बनविण्यासाठी फुले खरेदी करण्यासाठी बाजारात गर्दी करीत आहेत.

दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत लाल व पिवळ्या रंगाची झेंडुची फुले विक्रीला दाखल झाले आहेत. ६० रु. पासून १०० रुपयापर्यंत किलोनी झेंडुची फुले विकली जात आहे. खरेदीसाठी नागरीकांची बाजारपेठेत गर्दी दिसून येत आहे. झेंडुच्या फुलांसह आपट्याची पाने, आंब्याची डहाळे व भाताची कणसेही बाजारात उपलब्ध आहेत. मोठ्या प्रमाणात फुलांची दुकाने रोहा बाजारपेठेत थाटली आहेत. त्यामुळे बाजारपेठ फुलांनी सजल्याचे दिसून येत आहे.

# सुधागड- वावळोली आश्रमशाळेत केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा

## ४२० आदिवासी विद्यार्थ्यांचा सहभाग

**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण अंतर्गत सावरसई केंद्राच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा वावळोलीच्या भव्य क्रीडासंकुलात अतिशय उत्साही वातावरणात झाल्या.

या क्रिडा स्पर्धेत सावरसई, वरसई व वरवणे या तीन शासकीय व रानपाखरे, पडसरे चिवे व वावळोली अशा चार अनुदानित मिळून सात आश्रमशाळांतील एकूण ४२० आदिवासी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे उद्घाटन कुलाबा जिल्हा आदिवासी सेवा मंडळ संस्थेचे अध्यक्ष रविंद्र लिमये यांच्या प्रमुख उपस्थितीत व सहाय्यक प्रकल्प अधिकारी पेण विशाल घोरपडे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. या संपूर्ण स्पर्धेचे नियोजन वावळोली आश्रमशाळेच्या माध्यमिक मुख्याध्यापिका सरिता सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम प्रकारे करण्यात आले होते.

स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांची निवासाची व भोजनाची सोय उपलब्ध करून देण्यात आली होती तसेच स्पर्धा पार पाडण्यात संनियंत्रण समितीत वरवणे आश्रमशाळा मुख्याध्यापक अजित पवार, रानपाखरं आश्रमशाळा मुख्याध्यापक संजय नाईक, आश्रमशाळा मुख्याध्यापक जयवंत गुरव यांचे सहकार्य लाभले.

पंच म्हणून शिवा चव्हाण, मारुती गायकवाड सर, विजय काटकर, सुरेश कोकाटे, यशवंत वारगुडे सर, माळी सर, विजय पाटील, समाधान परबळकर, अनिल साजेकर यांनी अथक परिश्रम घेतले.

स्पर्धेचे विजेतेपद अनुदानित आश्रमशाळा रानपाखरं वरप, पेण तर उपविजेतेपद शासकीय आश्रमशाळा वरसई यांनी पटकावले. स्पर्धेच्या बक्षिस समारंभा करीता सहाय्यक प्रकल्प अधिकारी विशाल घोरपडे पेण, वावळोली आश्रमशाळा मुख्याध्यापिका सरिता सावंत, चिवे आश्रमशाळा मुख्याध्यापिका सुनिता पिंगळे, नाईक मॅडम सर्व आश्रमशाळांचे शिक्षक, अधीक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चिवे आश्रमशाळेचे प्राथमिक मुख्याध्यापक जयवंत गुरव यांनी केले तर आभार प्रदर्शन चिवे आश्रमशाळेच्या शिक्षिका सुजाता चव्हाण यांनी केले.





# कोकण विभाग पदवीधर मतदारांना नोंदणी करण्याचे आवाहन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पदवीधर मतदारसंघाच्या अनुषंगाने १ नोव्हेंबर २०२३ या अर्हता दिनांकावर आधारीत नोव्हेंबर २०२३ या कालावधीत पदवीधर मतदार नोंदणी सुरू आहे, तरी ज्या मतदारांनी दिनांक १ जानेवारी २०२० पूर्वी पदवी प्राप्त केली आहे. ते मतदार पदवीधर मतदारसंघा करीता नाव नोंदविण्यास पात्र आहेत.

पदवीधर मतदार नोंदणी ऑनलाईन पद्धतीने संकेतस्थळ https://ceoelection.maharashtra.gov.in यावर लिंकद्वारे https://ceoelection.maharashtra.gov.in/Downloads/DownloadForms/Form-18.pdf नोंदणी अर्ज उपलब्ध करून देण्यात आला आहे. जे मतदार पदवीधर मतदारसंघामध्ये मतदार नोंदणी करण्यास इच्छुक आहेत. त्यांनी नमुना नं. १८ अर्ज भरून घ्यावे अथवा ऑनलाईन पद्धतीने नमुना नंबर १८ चा अर्ज भरुन आवश्यक कागदपत्रासहीत तहसिलदार कार्यालय पनवेल येथे जमा करावेत.

नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये कागदपत्रांवर राजपत्रिय अधिकारी/पब्लिक नोटरी साक्षांकन असणे आवश्यक आहे.

पदवीधर मतदारसंघ नाव नोंदणी मोहीम कोंकण आणि मुंबई विभागासाठी नोंदणी करणारा मतदार हा ३० ऑक्टोबर २०२०पूर्वी पदवीधर झालेला असावा. त्यानंतर पदवीधर झाला असेल त्यांनी फॉर्म भरू नये. पदवी परिक्षेचा निकाल घोषित झालेला दिनांक तीन वर्षांची मुदत ठरविताना विचारात घेतला जाईल.

पदवी किंवा पदवी समकक्ष धारण केलेली मार्कशिट किंवा पदवी प्रमाणपत्र, आधार कार्ड, इलेक्शन कार्ड, रेशन कार्ड किंवा लाईट बिल, नावात बदल असल्यास लग्न प्रमाणपत्र किंवा गॅझेट कॉपी, मतदार हा पदवीधर मतदारसंघातील रहिवासी असावा, एक पासपोर्ट साइज कलर फोटो, सर्व झेरॉक्सवर आपली सही करावी.

पनवेल तालुक्यातील सर्व पात्र पदवीधारकांनी जास्तीत जास्त प्रमाणात कोकण पदवीधर मतदारसंघासाठी मतदार नोंदणी असे आवाहन पदनिर्देशित अधिकारी, कोकण पदवीधर मतदारसंघ तथा उपविभागीय अधिकारी पनवेल राहुल मुंडके यांनी केले आहे.

# मैत्रीबोधचा पारंपरिक समारंभासह अनोखा नवरात्रोत्सव



**कर्जत : प्रतिनिधी**

नवरात्रीचा जागर खऱ्या अर्थाने प्रत्येकास स्वतः मधील शक्ती नव्याने ओळखण्यासाठीचे पर्व आहे. मैत्रेय दादाश्रीजी यांच्या मार्गदर्शनात मैत्रीबोध परीवार कामतपाडा, जामरुंग येथील शांतीक्षेत्र प्रेमगिरी आश्रमामध्ये पारंपारिक सांस्कृतिक पद्धतीने पूजा, हवन आणि सामाजिक एकात्मिकतेसह साजरा होत आहे. या निमित्ताने ४३ गाव व पाड्यातील महिला व विद्यार्थ्यांना भोंडला, लोप पावत चाललेली प्राचीन पारंपरिक ग्रामीण नृत्यकला, वक्तृत्व, पोवडा, गायन व भजन सादरीकरण करत एकत्रित येण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

दररोज विविध पाच गावातील ३५० महिला, दोन शाळेतील १०० विद्यार्थी आणि चार प्रासादिक भजन मंडळी सकाळी ११ ते रात्री १२:३०पर्यंत हा आनंद लुटत आहेत. सहभागी प्रत्येक गावासाठी सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन कौतुक करण्यात येत आहे.

प्रत्येक महिला ही त्यांच्या घरातील सदैव प्रज्वलित ज्योत असल्याचं स्मरण करून देण्यासाठी त्यांना हळद कुंकूसह दीप देऊन कौतुक करण्यात येत आहे. सर्व सहभागी मुलांना वही, कलर, पेन्सिल व पेन देण्यात येत आहे. विजया दशमीच्या दिवशी सकाळी ४३ गावातील ग्रामस्थांसह ढोल-ताशांसह भव्य शोभायात्रा, महाआरती, प्रसाद वितरण व माहेरची साडी कार्यक्रमदेखील आयोजित केला आहे.





पनवेल : तालुक्यात ठिकठिकाणी नवरात्रोत्सवाचा जल्लोष सुरू आहे. त्या पार्श्वभूमिवर आमदार प्रशांत ठाकूर यांनी विविध मंदिरांमध्ये देवीचे मनोभावे दर्शन घेतले. तक्का येथील जरी मरी आई मंदिर येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, भाजप शहराध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक अजय बहिरा, युवा नेते प्रतिक बहिरा, रघुनाथ बहिरा, प्रभाकर बहिरा, जगन्नाथ बहिरा आदी तर काळुंद्रे येथील मरीआई मंदिरात अनंत पाटील, शंकर म्हात्रे, शक्तीकेंद्र प्रमुख बाळाराम चिखलेकर, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य सचिन चिखलेकर, विशाल म्हसकर, गणेश घरत, कुणाल म्हात्रे, प्रतिक भोईर आदी उपस्थित होते.





पनवेल : उरणचे आमदार महेश बालदी यांनी दिवा अँटीलिया सोसायटीमध्ये दुर्गामातेचे दर्शन घेतले. या वेळी रहिवासी मंडळातर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले. विजय मुरकुटे, योगेश पाटील, विशाल येरुणकर, वाजित, बिनय, सुरेश, सचिन सावंत, गुरव, चंद्रकांत पाटील, परशुराम, अनिल, रोहित, ढेने, मारुती पाटील, येरुणकर काका, गुरव काका हे उपस्थित होते.



माता वैष्णोदेवी सामाजिक विकास महिला मंडळ, सिवूड्स, नवी मुंबई



जरी मरी आई मंदिर, महिला मंडळ डोलघर, पनवेल



रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर






पनवेल : श्री रामशेठ ठाकूर विचार मंच नवीन पनवेल यांच्या विद्यमाने भव्य नवरात्र उत्सव २०२३चे आयोजन नवीन पनवेल येथील सिडको मैदान येथे करण्यात आले. सिडको मैदानात माजी नगरसेवक संतोष शेट्टी यांच्या मार्गदशनाखाली गरब्याचे आयोजन करण्यात आले. रविवारी मान्यवरांच्या हस्ते आठव्या दिवसाच्या विजेत्या स्पर्धकांना बक्षिस देऊन गौरविण्यात आले. या वेळी गरबा खेळण्यासाठी चिमुकल्यांसह महिला, युवती आणि तरुणाई मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



एआरएच (आर्किटेक्ट ऋषीकेश हडनोरकर) ऑफीस, एमआयडीसी, अंधेरी पूर्व



सद्‌गुरू अपार्टमेंट, माणगाव



माणगावमधील वकील महिला.



चिंचवण (पनवेल) गावाची महालक्ष्मी माता












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com